# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन ॲपद्वारे)

**सभा क्रं. - २६** **दि.२६/०२/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२६/०२/२०२१ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| खडके सुनिल वामनराव- **मा.उपमहापौर** | पाटील चंद्रशेखर शिवाजी | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| जोहरे प्रिया मधुकर | कापसे मयुर चंद्रकांत | सोनार रंजना विजय |
| नेरकर सरिता अनंत | कापसे प्रतिभा चंद्रकांत | खडके विश्वनाथ सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | देशमुख प्रतिभा गजानन | सोनवणे राखी शामकांत |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील विजय पुंडलिक | तायडे ज्योती शरद |
| सोनवणे कांचन विकास | सोनवणे सुरेश माणिक | लढढा नितीन बालमुकुंद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बारी शोभा दिनकर | चौधरी मनोज सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | शेख हसीनाबी शरीफ | बरडे नितीन मनोहर |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील कुलभुषण विरभान | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | शेख शबानाबी सादीक |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | नाईक प्रशांत सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे ललीत विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| कोल्हे प्रविण रामदास | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| सनकत चेतन गणेश | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | तायडे सुरेखा नितीन | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | चव्हाण ज्योती बाळासाहेब | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी मंगला संजय | मराठे जितेंद्र भगवान | देशमुख सुन्नाबी राजु |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे सुरेखा सुदाम | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे धिरज मुरलीधर | ढेकळे सदाशिव गणपत | **स्विकृत सदस्य** |
| भोळे सिमा सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | बालाणी भगतराम रावलमल | मराठे राजेंद्र नारायण |
| सोनवणे अश्विन शांताराम | अत्तरदे रजनी प्रकाश | चौधरी महेश रतन |
| पाटील सचिन भिमराव | काळे रेश्मा कुंदन | जैन भागचंद मोतीलाल |
| भोईटे लताबाई रणजीत | आहुजा मनोज नारायणदास | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, व सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले. शिवसेनेचे श्री.प्रशांत सुरेश नाईक, श्री.नितीन बालमुकुंद लढढा, श्री.नितीन मनोहर बरडे, श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी, श्री.विक्रम किसन सोनवणे तसेच एम.आय.एम.चे गटनेता श्री.रियाज अहमद अब्दुल करीम बागवान या सन्मा.सदस्यांनी मा.महापौर सो.भारती कैलास सोनवणे व सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांचे फुलगुच्छ व सन्मानपत्र देवुन सत्कार केले.

**श्री.प्रशांत नाईक :-** आज शिवसेनेच्या वतीने मा.महापौरांचा सभागृहात सत्कार करण्यात आला. सन्मान जनसेवेचा आदरणीय भारतीताई सोनवणे, महापौर, जळगांव महानगरपालिका, जळगांव जिल्हा. दि.२७ जानेवारी २०२० या तारखेला सुत्रे हातात घेतली. प्रथम नागरिक व जनसेवक या नात्याने आपण महानगरपालिकेच्या महापौर म्हणुन गेल्या वर्षभरात मोठी लक्षणीय कामगिरी करुन दाखविली. एक महिला म्हणुन आपण शहर विकासाच्या दृष्टीने उत्तम नियोजन केले. शहराची काही प्रलंबित प्रश्नेमार्गी लावली. त्यासह मनपा कर्मचाऱ्यांचे प्रश्न देखील सोडविले. यात काही गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. वर्षभरापुर्वी करोना आजाराची महामारी देशात आली. जळगांवात आपण कोविड दक्षता केंद्राच्या माध्यमातुन कोरोना आटोक्यात आणण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. शहरात कोरोना नियंत्रणात आणला त्यात आपला सहभाग आणि महापौर म्हणुन असलेले नेतृत्व वाखाणण्याजोगे आहे. रस्त्यावरील पथदिव्यांचा अनेक महिन्यापासुनचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावत चक्क एलईडी दिव्यांच्या माध्यमातुन शहराला उजळविण्याचे काम आपण केले. अमृत योजनेच्या माध्यमातुन भुयारी मलनिस्सारण योजनेचे अनेक प्रश्न मार्गी लावत आपण स्वच्छता निर्मुलनासाठी योगदान देण्याचा प्रयत्न केला. शहराच्या महत्वाच्या ठिकाणी असलेले बॅरिस्टर निकम चौकातील सागर पार्कचा विषय मार्गी लावत तेथे सुरक्षा कुंपण करणे आदी विषयावर आपण सकारात्मक निर्णय घेतले व ते कृतीत आणले. सुप्रीम कॉलनीच्या लोकांना सुमारे २० वर्षापासुन पाणी मिळत नव्हते. त्या भागातील जलकुंभाचा प्रलंबित विषय मार्गी लावुन आपण त्या भागातील लोकांना पाणी मिळवुन दिले आहे. ताई या भागातील एका जेष्ठ नागरीकाने तर आपल्याला पाणीवाली ताई अशी प्रतिक्रिया माझ्याकडे दिली आहे. या शब्दातच आपला सन्मान आहे. महानगरपालिका म्हटले की, तेथे सर्व पक्षांचे राजकारण, समाजकारण चालते. प्रत्येकाच्या त्यांच्या प्रभागविषयी मागण्या असतात. ताई आपण मात्र मनपातील भाजपसह शिवसेना, एमआयएम या तिन्ही पक्षातील नगरसेवकांसह इतर पक्षांच्या पदाधिकाऱ्यांशी देखील सातत्याने सकारात्मक संवाद साधुन विकास कामांसाठी सर्वपक्षीय सहकार्याचा धागा विणला. आपण अनेक रखडलेले प्रकरणांना चालना दिली.आपल्या कार्यकाळात विकास कामांना चालना मिळाल्याच सकारात्मक वातावरण जाणवल.आपण पद सांभाळल्यानंतर उल्लेखणीय आणि प्रशंसनीय बाब म्हणजे आपण सत्ता, पक्ष किंवा विरोधीपक्षाचा भेद केला नाही. सगळयांचा सन्मान वागुन आणि न्याय देण्याचा प्रयत्न केला. याच्यातुन आपला नेतृत्वाचा प्रभाव जाणवला. आपला जनसेवेच कार्य पुढे असच सुरु राहाव. आपणास भविष्यात खुप यश व किर्ती मिळो हीच शुभेच्छा.

**नगरसचिव :-** सन्मा सभागृहाचं या आजच्या महासभेत स्वागत आहे. सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी वंदेमातरमसाठी उभं राहायचे आहे.

**वंदे मातरमने सभेस सुरूवात करण्यात आली.**

**श्री.अमित मनोरे, ऑनलाईन सभा तांत्रिक तज्ञ :-** सर्वात पहिले आपणास सुचना अशी आहे की, आपल्या इंटरनेटचा स्पीड किती आहे हे आपण चेक करायचे आहे. जर आपला आवाज येत नसेल किंवा समोरच्याचा आवाज आपल्याला येत नसेल तर मिटींग मध्ये प्रॉब्लम असतो असे नसते. इंटरनेटचा स्पीड कमी झाल्यामुळे असे घडत असते. आपला आवाज जर येत नसेल किंवा समोरच्याचा आवाज येत नसेल तर एकदा बंद करुन तुम्ही इंटरनेट स्पीड चेक करुन तुम्ही पुन्हा जॉईंट व्हा. म्हणजे तुमच्यामुळे दुसऱ्यांनाही प्रॉब्लम होणार नाही.आणि आपल्यालाही देखील एक चांगल्या प्रकारे आवाज ऐकु येऊ शकतो. दुसर सर कृपया कोणीही स्पीकरवर ऐकु नये. स्पीकरवर ऐकल्यामुळे काय होत. आवाजामध्ये डिस्टबन्स तयार होत. प्रत्येकाने ईयरफोन जर वापरले ऐकण्यासाठी मिटींग सभागृहातील लोकांनी किंवा सभागृहातील बाहेरील लोकांनी जर ईयरफोन वापरले तर आवाज एकदम सुस्पष्टपणे ऐकु येऊ शकतो आणि ही सभा चांगल्याप्रकारे होऊ शकते. तिसरे आपण स्पीकर चालु करुन शेजारी शेजारी बसु नये. शेजारी शेजारी बसल्यामुळे आपल्या माईक मधील आवाज दुसऱ्याच्या माईक मधील आवाज, एकमेकांचा आवाज मिक्स होतो आणि सभेमध्ये व्यत्यय येण्याची शक्यता असते. म्हणुन साधारण सभा घेत असतांना किंवा सभेमध्ये बसले असतांना ऑनलाईन सभा जॉईंट करतांना कृपया दोन लोकं एकत्रीत बसुन सभेला हजर राहु नये.धन्यवाद.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.चौधरी चेतना किशोर यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत. त्यानंतर काही श्रध्दांजलीचे प्रस्ताव आलेले आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | भंगाळे विष्णू रामदास | १)गणेश मेडीकलचे राजेंद्र पाटील व निसरा मेडीकलचे निलेश पाटील, विसनजी नगर यांचे वडील स्व.निवृत्ती शंकर पाटील २)महावीर ज्वेलर्स सुवर्णपेढीचे संचालक अजय, निलेश ललवाणी यांचे वडील स्व.शांतिलाल रुपंचद ललवाणी ३) नितीन, ललित व ए.टी.झांबरे विदयालयाचे शिक्षक बिपीन झोपे रा.राधकिसन वाडी,जळगांव यांचे वडील स्व.दिनकर डी. झोपे ४)गणेशवाडी येथिल ॲड.किशोर महाजन यांच्या पत्नी अभिनव प्रा.विदयालयाच्या शिक्षिका स्व.संगीता किशोर महाजन ५) प्रभुदेसाई कॉलनी येथिल भारत दुग्धालय व मनीष दुग्धालयाचे संचालक श्यामसुंदर झंवर यांच्या पत्नी व मनीष व गिरीश झंवर यांच्या आई स्व.पुष्पा श्यामसुंदर झंवर ६)ओंकार नगर येथिल योगेश अग्रवाल व ओमप्रकाश अग्रवाल यांच्या आई स्व.प्रेमलता रामप्रसाद अग्रवाल ७) केमिस्ट भवन, सबजेलच्या मागील रहिवासी केमिस्ट असो.चे सचिव शामकांत वाणी यांच्या आई स्व.लिलाबाई रमेश वाणी (मराठे) ८)जीवन नगर येथिल रहिवासी तथा धनलक्ष्मी मेडीकलचे संचालक स्व.धनेश्वर प्रल्हाद येवले ९)रामेश्वर कॉलनी येथिल ईश्वर ढिवरे यांचे भाऊ स्व.संतोष ढिवरे १०)सुभाष रामदास शिरसाळे यांचे सुपुत्र स्व.राजेंद्र सुभाष शिरसाळे ११)खेडी येथिल स्व.अरुण पाटील १२)शासकिय तंत्रनिकेतचे प्राचार्य डॉ.महेंद्र इंगळे यांचे वडील स्व.विश्वनाथ दत्तु इंगळे १३)ओंकार नगर |

| | | |
|---|---|---|
| | | येथिल मिलिंद व मनोज चौधरी यांच्या मातोश्री स्व.जनाबाई अशोक चौधरी १४)आदर्श नगर येथिल योगेश कलंत्री यांचे वडील स्व.प्रेमराज कलंत्री १५)गणेश वाडी येथिल रहिवासी तथा मनपा नगररचना विभागाचे निवृत्त अभियंता चंद्रकांत नेहते यांच्या मातोश्री स्व.सुमन दिनकर नेहते यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | भिल पार्वताबाई दामू | मनपा सदस्या,सौ.पार्वताबाई दामू भिल यांचे पुतणे स्व.सुकलाल उखा भिल यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | पाटील चंद्रशेखर शिवाजी | १)प्र.क्र.८ चे रहिवासी केबीएक्स कामगार युनियन चे अध्यक्ष शैलेंद्र भाऊ इंगळे, शासकिय तंत्रनिकेतचे प्राचार्य डॉ.महेंद्र व्ही. इंगळे यांचे वडील, माजी नगरसेविका सौ.ज्योती इंगळे यांचे सासरे कै.विश्वनाथ दत्तात्रय इंगळे २) प्र.क्र.८ चे रहिवासी प्रसिध्द चित्रकला शिक्षक कै.मधुकर लोटन जगताप यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | सनकत चेतन गणेश | मनपा सन्मा.नगरसेविका चेतना किशोर चौधरी यांचे जेठ व माजी नगरसेवक श्री.किशोर भाऊलाल चौधरी यांचे भाऊ स्व.गोकुळ भाऊलाल चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई मला बोलायच होत.

**सौ.दिपमाला काळे :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया, एक अभिनंदनाचा प्रस्ताव सादर करत आहे.

**सौ.दिपमाला काळे :-** दादा, एक मिनीट मला बोलुन घेऊ द्या.मागील वर्ष दिड वर्ष झाले मी ख्वाजामियाँ दर्गेच्या अतिक्रमणाचा विषय मी महासभेत मांडत आली आहे. मागे मला सत्ताधारी नगरसेवक असुन ही आंदोलन कराव लागल होत. पण तेव्हा मला मा.महापौर सौ. भारतीताई सोनवणे, आयुक्त साहेब, श्री.कुलकर्णी साहेब व उपायुक्त यांनी शब्द दिला होता की, मला ते लवकरात लवकर तेथील अतिक्रमण मोकळ करुन देतील.आणि त्यांनी तात्पर्य दाखवुन तिथल अतिक्रमण मोकळ करुन दिल. त्या बद्दल मी महापौरताई सौ.भारतीताई यांच अभिनंदन करते व प्रशासनाच पण अभिनंदन करते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया मला एक अभिनंदनाचा प्रस्ताव सादर करायचा आहे. आपल्या महापालिका प्रशासनांतर्गत कार्यालयात असलेले आपले शहर अभियंता श्री.अरविंदजी भोसले यांची कामाची प्रगती पाहता त्यांचा मी दोन वेतनवाढीचा प्रस्ताव मी या ठिकाणी सादर करत आहे. तसेच त्यांचा कामाचा प्रगती अहवाल पाहता, त्यांच अभिनंदन देखील करतो, आणि अभिनंदनाचा प्रस्ताव सादर करतो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** प्रशासनाने जस ख्वाजामियाँ बद्दल तात्पर्य दाखविल तसेच

**श्री.चेतन सनकत :-** कुलभंषण भाऊंनी मांडलेल्या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हॅलो, माईक बंद करु नका मला परमिशन दिलेली आहे. महापौरताई मला ऐवढ बोलायच आहे, जेवढ तात्पर्याय ख्वाजानगरी बाबतीत दाखविल गेल, जळगांव शहरात असे कित्येक अतिक्रमण आहे. जे लोकांना त्रासदायक ठरत आहे. तर ऐवढ तात्पर्य प्रशासन दुसरीकडे का दाखवत नाही.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम इबा भाई विसरलेत का तात्पर्य दाखविल नव्हत का तेव्हा. महापौर मॅडम मला या ठिकाणी आणखी दोन जनांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडायचा आहे.
**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा आवाज येत नाही.
**श्री.कैलास सोनवणे :-** आता येतो आहे. इबा भाई आवाज आ रही है क्या.
**मा.महापौर :-** हो.
**श्री.कैलास सोनवणे :-** हॅलो, जस या ठिकाणी भोसले साहेबांचा अभिनंदनाचा ठराव मांडला तसेच मी या सभेमध्ये आमचे एस.एस.पाटील साहेब आणि वाहुळे साहेब यांचा सुध्दा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो. या लोकांनी ज्या प्रमाणे जशी हिम्मत दाखवायला पाहिजे. डी-मार्ट सिल करणे म्हणजे काही सादा विषय नव्हता. आणि त्याच जे काम चालु आहे अतिक्रमणच्या बाबतीत कोरोना रोखण्याच्या संदर्भात ते चांगल काम चालु आहे. त्याच प्रमाणे मी एस.एस.पाटील साहेबांचही अभिनंदन करतो की, त्यांनी पुर्ण शहरात एल.ई.डी.लावण्याच काम फार उत्कृष्टपणे केलेल आहे. आणि या टिमचे जे कप्तान आहे आयुक्त साहेब या सर्वांच या ठिकाणी मी अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवतो.
**श्री.कुलभुषण पाटील :-** अप्पांनी सादर केलेल्या प्रस्तावाला माझ अनुमोदन आहे.
**श्री.ईब्राहिम पटेल :-** शिवसेनेचा ही पाठिंबा आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७० पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सोनवणे भारती कैलास मा.महापौर | कु.समृध्दी हर्षल संत हीने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे एन.सी.सी. कॅडेट राष्ट्रीय परेडचे पथसंचलन केल्याबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| २. | सनकत चेतन गणेश | जळगांव शहर महानगरपालिका प्रथम नागरीक महापौर सौ.भारतीताई कैलास सोनवणे व उपमहापौर श्री.सुनिल वामनराव खडके, सभापती स्थायी समिती श्री.राजेंद्र घुगे पाटील व संपुर्ण सन्मा.नगरसेवक व नगरसेविका तसेच महानगरपालिका डॉक्टर्स, दवाखाना, सफाई कामगार, मलेरीया कर्मचारी व संपुर्ण मनपा अधिकारी व कर्मचारी यांनी कोविड १९ या महामारीच काळात संपुर्ण शहरवासियांना स्वत:च्या जीवाची पर्वा न करता नागरीकांना अत्यावश्यक व सर्वोत्तम गरजेच्या सेवा पुरवित असून ही बाब जळगांव शहर महानगरपालिकेस गौरवणिय असल्यामुळे त्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३. | काळे दिपमाला मनोज | ख्वॉजामियॉ दर्गाजवळील अतिक्रमण काढून नागरीकांसाठी रस्ता मोकळा करुन अतिक्रमण काढून दिल्याबद्दल महापौर सौ.भारती कैलास सोनवणे तसेच उपायुक्त,श्री.संतोष वाहुळे साहेब यांचे सुध्दा यांचे हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ४. | पाटील कुलभुषण विरभान | ख्वॉजामियॉ दर्गाजवळील अतिक्रमण काढलेबद्दल शहर अभियंता अरविंद भोसले यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ५. | सोनवणे कैलास नारायण | १) जळगांव शहरात विदयुत पोलवर LED चे लाईट लावणेचे काम श्री.एस.एस.पाटील यांनी चांगल्याप्रकारे केलेबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन.<br>२) कोराना महामारी चालू असल्याने मास्क न लावणेबद्दल नागरीकांना दंड करणे तसेच याप्रकरणी डिमार्टला दंड केल्याबद्दल उपायुक्त,श्री.संतोष वाहुळे साहेब यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ६. | सोनवणे कैलास नारायण | प्रभारी शहर अभियंता अरविंद भोसले यांनी जळगांव शहरातील घनकचरा डी.पी.आर. सुधारीत करणे, अमृत योजनेत वाढीव भागात १८५ कि.मी. लांबीची पाईप लाईन टाकण्याचा सुधारीत डी.पी.आर.तयार करणे व अमृत योजने अंतर्गत सुप्रीम कॉलनीत पाणी पुरवठा सुरु करणे इत्यादी बाबी कमी कालावधीत केल्याने त्यांना अतिरिक्त दोन वेतनवाढ देण्याबाबत शिफारस करण्यात येत असुन चांगल्या कामाबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दिनांक ०३/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री. कुलभुषण पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दिनांक:०३/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** १५ व्या केंद्रीय वित्त आयोग शिफारशीनुसार राज्यातील Non-Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चिती बाबत दि.२८ ऑक्टोंबर, २०२० च्या पारित शासन निर्णयाची माहिती घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर विषयाची माहिती घेतली विषय मान्य आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट महापौर साहेबा.

**मा.महापौर :-** बोला अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे जे विषय आहे. विषय क्र.५,९,१३,१४,१५,२०,२६ त्यानंतर २७,२८,२९,३० हे सारखेच विषय आहे. अंदाजपत्रकांचे विषय आहे. या सर्वांवर एकखट्टी चर्चा करण्यात यावी. कुलभुषण भाऊ त्याच्यावर बोलणार आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-**मा.महापौर महोदया, या सर्व जे विषय आहे. हे सर्व विषय मान्य करुन या सर्व संबंधीत विषयांची जळगांव शहरामध्येच विकास कामांच्या दृष्टीने हे सर्व निधी आपल्याला शासनाकडुन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आपण हे सर्व विषय मान्य करावे. ही माझी विनंती आहे.

**नगरसचिव :-** विषय कोणते कोणते आहे ते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तुम्हाला संख्या सांगितली ना अप्पांनी.

**श्री.कैलास सोनवणे :-** परत सांगतो तुम्हाला. नंबर सांगतो फक्त. विषय क्र.५,९,१३,१४,१५,२०,२६, २७,२८,२९,३० मी ही यादी देईल ना तुम्हाला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बांधकामाबाबतचे सर्व विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** बांधकामाचे सगळे विषय आहे ते.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ

**श्री.नितीन लढढा :-** हो मान्य.

**नगरसचिव** :- रियाज भाई, रियाज भाई.

**मा.महापौर :-** रियाज भाई.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.रियाज बागवान :-** विषय क्र.२६ जो है. हॅलो, विषय क्र.२६ मे, अ.क्र. ९३ का जो विषय है. प्रभाग क्र.१७ काशिनाथ हॉटेल गुरुकुल कॉलनी, ये विषय प्रभाग क्र.१७ और १८ दोनो का मिलकर विषय है. ये जो हिस्सा है. इसमे कुछ हिस्सा.

नगरसचिव :- विषय क्र.२६ क्या ?

**श्री.रियाज बागवान :-** हा ये जो विषय क्र.२६ मे अ.क्र.९३ तो वार्ड क्र.१७ और १८ दोनो का मिलके विषय है वो. करेक्शन है.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे काही करेक्शन असेल ते सुधारुन घ्याव.

**नगरसचिव :-** रियाज भाई, बाकी सर्व मंजुर का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर

**मु.ले.प. श्री.कपील पवार :-** १५ व्या वित्त आयोगाचा शासन निर्णय आपण यापुर्वी माहितीसाठी ठेवला होता, हा १५ व्या वित्त आयोगाचा विषय ठेवण्यामागे पर्पझ असा आहे आपला की, १५ व्या वित्त आयोगाची २८ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयानुसार विनीयोगाची कार्यपध्दती दिलेली आहे. त्या विनीयोगाच्या कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी करण्याचे अधिकार सर्व साधारण सभेच्या ठरावानुसार त्याची शिफारस गरजेची आहे. त्या शिफारसीनंतर आयुक्त या कामांना प्रशासकीय मान्यता देतात. त्याला जसा आपण १४ व्या वित्त आयोगाचा ठराव केला होता की, धोरणात्मक बाबींना शिफारस करण्यात येईल. आणि त्यानंतर कामांना मा.आयुक्त प्रशासकीय मान्यता देऊ शकता तसा हा ठराव येथे अपेक्षित आहे.

**नगरसचिव :-** मंजुर आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे, विषय क्र.३ घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, १५ व्या केंद्रीय वित्त आयोग शिफारशीनुसार राज्यातील Non-Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चिती बाबत नगरविकास विभागाकडील शासन निर्णय

क्रमांक.एफएफसी-२०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ मंत्रालय, मुंबई दि.२८ ऑक्टोंबर, २०२० च्या पारित शासन निर्णयाची माहिती घेतली. व सदर शासन निर्णयानूसार १५ व्या वित्त आयोगाच्या निधीला खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** भुसंपादन प्रस्ताव क्र.२३६/२०१८ मौजे पिंप्राळा अंदाजित ५० टक्के अगाऊ मोबदला भरणा करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदरील जागा, या जागेवरती आरक्षण होत. परंतु त्याच्यानंतर त्याच रुपांतर व्हेजीटबल मार्केट आणि शॉपिंग कॉमप्लेक्स अस झाल. आणि ही जी जागा आहे. आज रोजी आपणास भुसंपादनाची ही जागा शहराच्या बाहेरची आहे. ज्या ठिकाणी शॉपिंग कॉमप्लेक्स किंवा व्हेजीटेबल मार्केटची आज रोजी गरज नाही. व्हेजीटेबल मार्केट आणि शॉपींग कॉमप्लेक्स शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असले पाहिजे. शहराच्या बाहेर नको असले पाहिजे. म्हणुन त्या जागेच्या भुसंपादनाची आज रोजी गरज नाही. परंतु शासनाकडुन जर अस पत्र आलेल आहे. आपल्याला ५० टक्के अगाऊ मोबदला भरणेबाबतचा. सदरील जागेवरती आज रोजी त्याची भौगोलिक स्थिती बघितली असता, ती जागा कुठल्याच कामाची नाही. म्हणजे त्या ठिकाणी त्या जागेतुन आर्धा नाला गेलेला आहे माझ्या माहितीनुसार त्याच्यामुळे आपल्याला त्या जागेच्या भुसंपादनाची गरज नाही. आणि त्याला मोबदला देण्याची देखील गरज नाही. परंतु या प्रस्तावामध्ये या प्रस्तावासारखे १५ प्रस्ताव आपण शासनाकडे आयुक्त मार्फत, महापालिकेमार्फत सादर केलेले होते. त्या १५-१६ प्रस्तावांमध्ये शासनाने १३/०२/२०१३ च कलम १९ अन्वये १६२ च्या सुचनेनुसार त्यांना हे सर्व अतिरिक्त अधिकार प्रदान केलेले होते. त्यानुसार आयुक्तांनी या बाबतीत या सर्व विषयांची चौकशी करुन त्याबद्दलची समिती नेमावी. याच्यामध्ये कुठे पाणी मुरत आहे का ? हे बघाव, त्यानंतर हा विषय महासभेसमोर आणावा.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** कुलभुषण भाऊंनी मांडलेल्या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** शिवसेनेचाही पाठिंबा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.४,२४ आणि १९ हे सारखेच विषय आहे त्यांच्यावर एकत्रीत चर्चा करण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नेट प्रॉब्लेम झाला आहे. ज्या वेळेला याच्या संदर्भातला आरक्षण घ्यायचाच नसेल. तर आपण तो नामंजुर करण्यात यावा ना. म्हणजे मोबदला देण्याचा कारण नाही. त्याच्या बद्दल शासनाने आपल्याला बंधनकारक केलेल नाही. ते सर्वस्वी महासभेचा अधिकार आहे. आपल्याला जागेची गरज असेल तर प्रस्ताव मान्य करावा. आणि गरज नसेल तर प्रस्ताव नामंजुर करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला नामंजुर करा तो विषय.

**मा.आयुक्त :-** हे भुसंपादन करण्याचे अधिकार हे जरी आयुक्तांना दिले गेले नसले, तर ते मुळ अधिकार महासभेचे आहे. अश्या वेळेला जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन जेव्हा आपल्या ५० टक्के अगाऊ रक्कम भरण्याचे संदर्भामध्ये सुचना येते. ती जर रक्कम आपण भरु शकलो नाही. किंवा भरण्याबद्दलच आपल वेगळ धोरण असेल. तर हे ५० टक्के रक्कम न भरल्या कारणाने जुन्या ७१(६) च्या नोटीफीकेशन प्रमाणे आणि नविन ॲक्टचे जे १९ च नोटीफिकेशन आहे. हे जिल्हाधिकारी काढु शकणार नाही. शासनाच्या धोरणाप्रमाणे, याचा एकत्रित परिणाम असा होणार आहे.जर आपण १२७ च्या नोटीसीप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही महानगरपालिकेची जबाबदारी पुर्ण करुन वेळेत सुरु करु शकले नाही. तर हे १२७ च्या नोटीस प्रमाणे तो कालावधी संपल्यानंतर हा आरक्षण लॅप्स होणार आहे. आणि याचा परिणाम म्हणुन ती जागा मुक्त होणार आहे. आपल्याला ही जागेला कायम स्वरुपी अडचणी मुक्त करायचे आहे. आणि महानगरपालिका याच्या संदर्भामध्ये जी काही आपण आरक्षणे ठेवतो. त्याच्या संदर्भामध्ये

भुसंपादन कराव लागेल, या परिसरामधील नागरीकांना नागरी सुविधा देण्यामध्ये जागेची अडचण भासु शकते.दुसरी बाजु विचारात घेऊन अश्या प्रकारच्या प्रकरणावर निर्णय घेणे योग्य होईल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ती जागा लॅप्स झाली तरी चालेल.

**मा.महापौर :-** बोला पोकळे साहेब.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या मध्ये टि.डी.आर. घेणे संदर्भात जी कार्यवाही झालेली आहे. टि.डी.आर. घेण्यामध्ये त्यांना फोन वरुन संपर्क करतात. त्यांना नोटीस का देत नाही. त्यांच्याशी लेखी का घेत नाही. त्याच्यानंतर आपण १२७ चा जो विषय सांगितलेला आहे. त्याची प्राथमिक प्रोसेस कुलभुषण भाऊंनी जो विषय मांडला समिती नेमण्याचा, सदर समिती पहिले नेमण्यात यावी त्याच्यानंतर हा विषय मांडण्यात यावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर महोदया, याच्या मध्ये सन्मा.सदस्य श्री.दिलीपभाऊ पोकळे यांनी जे सांगितल. ते अगदी बरोबर आहे आपण त्यांना टि.डी.आर.ची नोटीस दिल्यासंदर्भामध्ये आपल्याला त्या टि.डी.आर.संबंधीत माहिती घेण्यासाठी. किंवा त्यांनी टि.डी.आर. संबंधीत माहिती घेतली किंवा नाही. किंवा ते घेणार आहेत किंवा नाही. यासाठी आपल्याला दोन वर्षाचा कालावधी असते. आणि तदनंतर आपल्याला निर्णय घ्यायच आहे. तर आपला सद्या हा विषय जो आहे. तहकुब ठेवुन पुढच्या याच्यात घेण्यात यावा. किंवा त्याच्यामध्ये समिती नेमावी. एक कमिटी नेमावी. याचा निर्णय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौर महोदया, विषय अत्यंत स्पष्ट आहे. सदर भुसंपादनाखालील जमिन ही महानगरपालिकेला विकास कामांसाठी गरज आहे का ? आणि महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता, महानगरपालिकेला ५०% चा मोबदला हा ४ कोटी ४० लाख रुपये देणे हे शक्य आहे का ? आणि दुसरीकडे अश्या पध्दतीच्या आरक्षणाचा विकास करुन महानगरपालिकेला काही खुप मोठा आर्थिक हित साद्य होईल अशी काही परिस्थिती नाही. म्हणुन सभागृहाने अश्या पध्दतीच्या ठरावा वरती. भुसंपादनाची गरज असेल तर यस कराव आणि भुसंपादनाची गरज नसेल तर स्पष्ट प्रस्ताव नाकारावा. कारण काय होत अश्या पध्दतीने विषय तहकुब करुन प्रलंबीत होतात. पुन्हा महिन्या दोन महिन्यानंतर त्याच्यावर अश्याच पध्दतीचा निर्णय घेतला जातो. गरज नाही आपल्याला निश्चितपणे रद्द करुन टाकण्यात यावा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नितीन भाऊ बरोबर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** या जागेची मोबदला देण्याची आज गरज नाही. याच्या मध्ये आपण सदर समिती नेमल्यानंतर त्या समितीचा सविस्तर अहवाल येईल. त्याच्या संदर्भावर या विषयाचा निर्णय घ्यावा. हा विषय जो आहे. इतक्या वर्षापासुन प्रलंबित पडलेला विषय आहे. त्याची आज रोजी घाई करण्याची गरज नाही.

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, हा विषय तहकुब करण्यात यावा, समिती नेमुन ते जसा अहवाल आणतील तसा मिटींग मध्ये आणावा.

**नगरसचिव :-** समिती सदस्य लागतील ना मग.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो घ्या ना. श्री.कुलभुषण पाटील, ॲड.श्री.दिलीप पोकळे आणि ॲड.सौ.शुचिता हाडा. पुढच्या मिटींग मध्ये आणावा हा विषय.

**नगरसचिव :-** याच्यात तिनच सदस्य का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** हो तीनच सदस्य घेऊ.

**नगरसचिव :-** विरोधी पक्षाचे काही सदस्य याच्यात नेमावे लागतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढच्या मिटींग मध्ये ते येणार आहे.

**मा.महापौर :-** पुढच्या मिटींग मध्ये घेणार आहे हा विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** ही तीन जनांची समिती आहे. पक्षीय बलाबलचा विषय येत नाही. पक्षीय बलाबलाचा विषय कुठे येतो याच्यात. तो काही मोठा विषय नाही. तो छोटा विषय आहे.

**श्री.नितीन लढढा :-** समिती कुठलीही ठेवली ना. तर विरोधीपक्षाचे सदस्य राहतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** असा आहे का नियम ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ ही जी समिती आहे. ही काही आपल्याला राजकीय कामासाठी किंवा राजकीय निवडीसाठी समिती नेमायची नाही. ही प्रशासकीय बाब आहे प्रशासनाकडुन काही नुकसान होऊ नये म्हणुन आपण याला तहकुब ठेवायला काही हरकत नाही.
**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह) मध्ये मौजे पिंप्राळा गट नं.१०८ या जमिनीवर आरक्षण क्र.१०६, व्हिजीटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर करीता आरक्षण प्रस्तावित आहे. सदर जागा ही शहराबाहेर असल्याने तसेच भौगोलिकदृष्टया आजच्या स्थितीत सदर ठिकाणी व्हिजीटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर काहीच कामाचे नाही. सदर प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन अहवाल सादर करणेसाठी सन्मा.सदस्य, श्री.पोकळे दिलीप बबनराव, श्री.पाटील कुलभूषण विरभान व सन्मा.सदस्या, ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह यांची एक समिती नेमणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

नगररचनाकार यांनी त्वरीत समितीचे कामकाजानुसार समितीचा अहवाल पूढील महासभेत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) मा.महापौर यांचेकरिता महानगरपालिका फंडातुन वाहन खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.कैलास सोनवणे :-** तिन्हीही विषय नामंजुर.
**श्री.कुलभुषण पाटील :-** विरोधीपक्ष नेते, गटनेते ,महापौर, उपमहापौर, यांचे संदर्भातील गाडया घेण्याचे जे विषय आहे. तिघी विषय प्रशासनाची आज रोजी आर्थिक परिस्थिती पाहता नामंजुर करण्यात येत आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.४,१९, २४
**श्री.नितीन लढढा :-** आज जरी नविन वाहन घेण्याच्या संदर्भातला विषय तुम्ही नामंजुर करत आहात. आनंदाची गोष्ट आहे. परंतु काही पदाधिकाऱ्यांचे वाहने जी आहेत. ते गेल्या ६ महिन्यापासुन सुस्थितीत नाही. विरोधी पक्ष नेत्यांच वाहन मागील ४ महिन्यापासुन अन्डररिपेअर आहे. रिपेअरींगचा खर्च लाख दोन लाख काही असेल. परंतु त्याच्यासाठी विरोधीपक्ष नेत्यांच वाहन सुध्दा उपलब्ध नाही. कमीतकमी जे पदाधिकारी आज पदावर आहे. कमीतकमी त्यांची वाहने तरी सुस्थितीत ठेवण्याच्या सदर्भातली भुमिका प्रशासनाने घेतली पाहिजे.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब,
**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब.
**श्री.कैलास सोनवणे :-** कमीत कमी विरोधीपक्ष नेत्यांचे वाहन त्वरीत दुरुस्ती करुन त्यांच्या ताब्यात देण्यात यावे आयुक्त साहेब. त्यांना त्वरीत वाहन द्यावे त्यांना पुर्ण शहरामध्ये समस्यांसाठी फिराव लागत. काही कार्यकर्त्यांचे तक्रारी असतात काही नागरीकांच्या तक्रारी असतात. वार्डा वार्डात ज्या समस्या असतात. आयुक्त साहेब, विरोधीपक्ष नेत्यांची गाडी त्यांना त्वरीत दुरुस्त करुन त्यांना देण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महापौर यांचेकरिता महानगरपालिका फंडातुन वाहन खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर करणेत येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत (१) प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत लक्ष्मीनगर जवळील सार्व.शौचालय जवळचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे (२) प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत कुंभारवाडा सार्व.शौचालय जवळील रस्ता कॉंक्रीटचा करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४,९३,७१०/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील:-** विषय मान्य आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, १) प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत लक्ष्मीनगर जवळील सार्व.शौचालय जवळचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे (२) प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत कुंभारवाडा सार्व.शौचालय जवळील रस्ता क्रॉक्रीटचा करणेचे कामे हे १४ व्या वित्त आयोगाच्या अंतर्गतचा निधी पैकी ५०% निधी स्वच्छ भारत अभियान करिता राखुन ठेवलेल्या निधीतुन करण्यास प्रस्तावित करण्यात आले होते परंतु सदरचे कामे हे उक्त आयोगा अंतर्गत अनुज्ञेय नसल्याने वरील दोन्ही कामे दलितेत्तर / नगरोत्थान या योजने अंतर्गत निधीमधुन हाती घेण्यास आयुक्त यांनी आदेशीत केलेले आहे. त्यानुसार खाली नमुद कामे नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०२०-२१ करीता जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडील पत्र क्रं.नपा/१/सुजयो/२३०/२०२०-२१ दि.११/०९/२०२१ अन्वये रक्कम रु.५.०० कोटी अनुदान मनपास अनुज्ञेय असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार अनुज्ञेय अनुदानातुन रक्कम रु.४,४२,८७,६४१/- मात्रचे कामांना प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी जळगांव यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. उर्वरीत रक्कम रु.५७,१२,३५९/- मात्रचे अनुदान आज रोजी शिल्लक असल्याने खाली नमुद कामे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत लक्ष्मीनगर जवळील सार्व.शौचालय जवळचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२,७७,३३२/- |
| २. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत कुंभारवाडा सार्व.शौचालय जवळील रस्ता क्रॉक्रीटीकरणचा करणे | रु.२,१६,३७८/- |
| | एकूण रक्कम रु.- | रु.४,९३,७१०/- |

वर नमुद दोन्ही कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरचे काम नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मंजुर अनुदानापैकी शिल्लक असलेल्या अनुदानातुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.१८१ दि.१७/०५/१९८९ अन्वये शिवाजी उद्यान, मेहरुण येथील जागा मे.जे.के. डेव्हलपर्स यांना एकुण ३० वर्षासाठी नाममात्र आकार वार्षिक रु.१०१/- घेऊन अटी-शर्तीच्या अधीन राहुन कराराने भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. सदर जागेच्या कराराची मुदत संपल्याने सदरची जागा जळगांव महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आवाज येत नाही बरोबर.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मा.महापौर महोदया, येत आहे माझा आवाज. महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, उपमहापौर साहेब आणि आयुक्त साहेब, हा जो विषय आता महासभेसमोर आलेला आहे. खरं तर प्रशासनाने असा विषय महासभेसमोर का आणला. हा सगळयात पहिला प्रश्न आहे. जे प्रशासन त्यांच्या पार्श्वभुमी मध्ये स्पष्टपणे म्हणत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे आयुक्तांची खात्री पटल्यास आयुक्त महानगरपालिकेच्या जागेतुन व्यक्तींना काढुन टाकण्याचा अधिकार प्राप्त आहे. आयुक्तांना जर हे अधिकार प्राप्त आहे तर यासाठी पुन्हा महासभेची परवानगी वेगळी घेण्याच कारण काय ? ८१ब प्रमाणे आपण ज्या व्यक्तींना नोटीस देत असतो. तो प्रत्येक विषय या महासभेसमोर येत असतो का ? आयुक्तांचे जे अधिकार आहे, आयुक्तांना दिलेले अधिकार आहे हे आयुक्तांनी ते वापरावे. का वापरले नाही आयुक्तांनी डायरेक्टली ते अधिकार. येथे खर तर मला अस सांगाव अस वाटेल की, महापालिकेची जी मालमत्ता आहे, महापालिकेच्या एका मालमत्तेला वेगळा न्याय आणि दुसऱ्या मालमत्तेला वेगळा न्याय अस असु शकत का ? मुळात स्थायी निर्देश क्र.२४ जे आहे. अतिशय स्पष्टपणे नमुद केलेल आहे. महानगरपालिका कायद्यानुसार आपण फक्त ३ वर्षासाठी कोणतीही महापालिकेची प्रॉपर्टी देऊ शकतो भाडेपट्टयाने, त्यानंतर पुन्हा नुतनीकरण करायच असेल, मॅक्झीमम ते ९ वर्ष असल पाहिजे. ३० वर्षासाठी ही दिली. ठिक आहे त्यावेळेला ही बॉडी नव्हती, हे आयुक्त नव्हते, नगरपालिका होती महानगरपालिका नव्हती. हे सगळे मुद्दे जरी असले, तरी सुध्दा पुन्हा हा प्रश्न निर्माण होतो की, हा प्रश्न जेव्हा आपण सोडविण्याचा विचार करतो आहे. त्यांना नोटीस दिली आपण ८१ब नुसार डायरेक्टली आपण ती प्रॉपर्टी आपल्या ताब्यात का घेतली नाही. मी तर येथे अस म्हणेल की, आपण जस गाळे धारकांना ८% वार्षिक भाडे, ५ पट दंड हे सगळ लावतो आहे. त्यांची मुदत संपल्यानंतर तोच कायदा येथे का लागु होऊ शकत नाही. येथे सुध्दा तोच कायदा लागु झाला पाहिजे. रु. १०१/- नाममात्र भाडे, वार्षिक भाडे, जागा किती आहे ती १०९२५ चौ.मी. ११५ x ९५ मीटर म्हणजे. ऐवढी मोठी जागा आजच्या रेडीरेकनरनुसार जर त्याच रेट बघितला तर ३,००,६१,७५०/- हे त्याच भाड येणार आहे. रेडीरेकनर प्रमाणे आपल्या येथील जे या फिल्ड मधील तज्ञ अधिकारी आहे ते जास्त चांगल हे गणित सांगु शकणार आहेत. असच सगळ गाळे धारकांना आपण वेगळा न्याय लावतो. त्यांच्याकडुन आपण ५ पट दंड घेतो. ८% वार्षिक भाड मागतो. आणि यांना रु.१०१/- ने नाममात्र भाडयाने जागा दिलेली आहे ऐवढी मोठी. हे आपल्या प्रस्तावाच्या पार्श्वभुमीतच नमुद आहे की, त्यांनी सगळया अटीशर्तींचा भंग केलेला आहे. तेथे त्यांना लहान मुलांच्या उद्यानासाठी ही जागा देण्यात आलेली होती. पिकनीक स्पॉटबाबत विकसीत करण्याचे तपशीलवार प्लॅन इत्यादी महापालिकेस परवानगीसाठी कोणतेही दस्तऐवज जे.के.डेव्हलपर्स यांनी सादर केल्याचे दिसुन येत नाही. हे सुध्दा प्रशासनाने तेथे नमुद केलेल आहे. म्हणजे प्रशासन हे सगळ मान्य करत आहे की, त्यांनी सगळया अटीशर्तींचा भंग केलेला आहे. रु.१०१/- नाममात्र भाड मी पुन्हा अधुरेखीत करते हे, काय चालत तेथे बालउद्यानाच्या नावाखाली, कॉकटेल पार्ट्या चालतात तेथे. प्रचंड मोठी कमाई तेथुन होते. पर्सनली व्यक्तीसाठी महानगरपालिकेला याचा काय फायदा आहे. महानगरपालिकेच्या हिताचा विचार

कधी आणि कोण करणार आहे. निश्चितच ही जागा ताबडतोब ताब्यात घेतली पाहिजे. हा प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्याची गरजच नव्हती. ८१ब ची नोटीस आपण बजविली प्रशांत पाटील साहेब आपल बोलण झाल होत या विषयावर. आपल्याला मी तेव्हा सुध्दा सांगितल होत. आपण नोटीस बजविलेली आहे. आयुक्तांना हे संपुर्ण अधिकार आहे. पुन्हा हा विषय महासभेसमोर आणण्याची गरज काय ? त्यांनी उत्तर दिलेल आहे आपल्याला त्यांनी दिलेल्या उत्तराचे सगळे मुद्दे तुम्ही स्व:ता खोडुन काढलेले आहे. मग पुन्हा महासभेसमोर कशासाठी आणला आपण प्रस्ताव.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** सन्मा.महापौर, जे.के. डेव्हलपर्सला जी जागा देण्यात आली होती. ती १९८९ मध्ये ३० वर्षाच्या कराराने टेन्डर प्रक्रियेद्वारे देण्यात आलेली होती. आणि त्यावेळेस जो करारनामा झालेला आहे. त्या करारनाम्यामध्ये अशी तरतुद आहे की, जर दोन्ही पक्षांची सहमती असेल म्हणजे त्यावेळेची नगरपालिका आणि जे.के. डेव्हलपर्स, या दोन्ही पक्षांची जर सहमती असेल आणि जे.के. डेव्हलपर्स यांनी अटीशर्तीच पालन केल तर त्यांना पुन्हा ३० वर्षाची मुदतवाढ देता येईल अशी त्या करारनाम्यामध्ये तरतुद आहे. आणि त्यावेळेचा जो नगरपालिकेचा ठराव आहे. त्यात सुध्दा हे नमुद आहे की, त्याला ३० वर्षाची मुदत देता येईल. मागच्या अश्या परिस्थितीमध्ये आपण त्याला ८१ब ची नोटीस दिली. आणि त्याचा जो खुलासा त्यांनी सादर केला. त्यात सुध्दा त्यानी ही बाब नमुद केली आहे की, अशी तरतुद असतांना आयुक्त महासभेच्या मान्यतेशिवाय आता निर्णय घेऊ शकतात का ? असा प्रश्न त्याठिकाणी उपस्थित केलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** त्यांनी जर सगळया अटीशर्तीचा भंग केलेला आपल्याला करारनाम्यात दिसुन येत आहे तर त्यांनी खुलासा दिलेल्या सर्व गोष्टी किती तकलादु आहे हे आपल्याला स्पष्टपणे दिसत आहे. अश्या परिस्थितीत त्याला इतक इन्टरटेन करण्याची गरज काय ? किंबहुना कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणुन आपल्याकडुन हे अपेक्षित होत साहेब की, आपण जो न्याय गाळेधारकांना लावत आहात तोच न्याय यांना सुध्दा लावायला पाहिजे. ज्या दिवशी त्यांच्या करारनाम्याची मुदत संपलेली आहे. त्या दिवसापासुन त्यांच्याकडुन दंड वसुल केला पाहिजे. आणि तो दंड सुध्दा जो बाजार भावाने त्याच भाड येईल त्याच्यावर असला पाहिजे. आता आजच्या सभेमध्ये आम्ही असा ठराव मांडत आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, शुचितातार्इंनी जेजे सांगितल त्याच्याशी आम्ही सहमत आहे. पाटील साहेब तुम्ही जे आता वाचुन दाखविल. करारनामा आणि ठराव, ठराव कायदेशीर नाही. ती पळवाट तुम्ही सांगायची नाही.

**श्री.नितीन लढढा :-** अप्पा, अप्पा, अप्पा. प्रशासनाची भुमिका जी आहे. तशी ती चुकीची नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तत्कालीन ठराव चुकीचे आहे. त्या अनुषंगाने प्रशासन बोलत आहे. तुम्ही सांगा काय बोलायच आहे तुम्हाला.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** जर ठराव न करता कार्यवाही केली तर तो कोर्टात जाऊ शकतो. आणि ऐवढा मोठा जो विषय आहे आपला तो तांत्रिक कारणामुळे अडचणीत येऊ शकतो.

**श्री.नितीन लढढा :-** अत्यंत योग्य आहे पाटील साहेब, आपण जे म्हणत आहात ते योग्य आहे. पुढे तांत्रिक अडचण राहु नये यासाठी हा ठराव मान्य करण्यात यावा. आणि पुढील कार्यवाही ताबा घेण्याच्या संदर्भातली, त्याच्या पुढे जाऊन सुध्दा मी सांगतो, या संदर्भात विधी सल्लागारांच मत घेऊन क्याव्हेट दाखल करण्यात याव. जेणे करुन कुठेतरी तांत्रिक कारणाचा आधार घेऊन स्थगिती मिळविण्याचा प्रयत्न सुध्दा अपील करणेपुरता हा ठराव मान्य करुन विधी सल्लागाराचा सल्ला घेऊन क्याव्हेट सुध्दा न्यायालयात दाखल करण्यात यावा. जेणे करुन कायदेशीर अडचणी येणार नाही. आणि जागा ताब्यात घेण्याच्या संदर्भात सुलभता निर्माण होईल.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** या विषयासंदर्भात आमची मुख्य विधी सल्लागार यांच्याशी बऱ्याचदा चर्चा झाली. त्या सगळया चर्चे अंती आम्ही अस ठरविल की, जे.के. डेव्हलपर्सला कोणताही तांत्रिक आधार देऊ नये. ती जागा आपल्याला लवकरात लवकर ताब्यात मिळावी. या विचारावर आम्ही शेवट आलो. आणि प्रशासनासमोर प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** अत्यंत योग्य भुमिका आहे पाटील साहेब आपली आणि निश्चितपणे ती कायद्याला धरुन भुमिका आहे. म्हणजे महानगरपालिकेचा सर्व अर्थाने हित जोपासण्याच्या दृष्टीकोणातुन या अनुषंगाने घेतलेला निर्णय मला काही चुकीच वाटत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, जस आता नितीन भाऊंनी म्हटल की, महापालिकेचा आर्थिक हित जोपासणारा निर्णय आहे. आम्ही सुध्दा स्वागत करतो की, शेवटी ती जागा प्रशासन ताब्यात घेत आहे. उशिराने का असेना प्रशासनाला जाग आलेली आहे. पण त्या सोबतच आम्ही असा ठराव येथे मांडतो आहे की, जेव्हा पासुन त्यांची मुदत संपलेली आहे. त्यांच्याकडुन दंड देखील वसुल केला जावा. आणि तो सुध्दा आताच्या बाजार भावाप्रमाणे त्या जागेच जे काही भाड येणार आहे त्यानुसार. जो न्याय आपण मनपाच्या इतर प्रॉपर्टर्यांना लावतो. तोच न्याय येथे सुध्दा लागला पाहिजे. याची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. आणि याची ताबडतोब अंमलबजावणी करायची आहे.

**मा.उपायुक्त, श्री.प्रशांत पाटील :-** ८१ब च्या नोटीसीमध्ये ते नमुद आहे. निश्चितच मुदत संपल्यापासुनची नुकसान भरपाई आणि शासकीय दर आपण त्यांच्याकडुन निश्चितच वसुल करु.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आजच्या बाजार भावाप्रमाणे ज्या त्या प्रॉपर्टीला लागणार आहे. त्यानुसार नुकसान भरपाई घ्यावी आणि ताबडतोब उद्याच्या उद्या ही जागा आपल्या ताब्यात घेण्यात यावी. विषय मान्य आहे.

**श्री.नितीन लढढा :-** योग्य आहे, योग्य आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला पुढचा विषय घ्या.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.१८१ दि.१७/०५/१९८९ अन्वये एकूण ३० वर्षासाठी नाममात्र आकार वार्षिक रु.१०१/- घेऊन अटी-शर्तीच्या अधीन राहून मे.जे.के.डेव्हलपर यांना शिवाजी उदयान मेहरुण येथील जागा, स्वखर्चाने मिनी ट्रेन, मेन स्टेशन, मेरी-गो राऊंड, इलेक्ट्रीक झुला इ. सुमारे ११५ बाय ९५ मी जागेमध्ये बसविणे, देखरेख करणे, चालविणे करीता भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. त्यानुसारचा करारनामा तत्कालीन नगरपालिकेचे मुख्याधिकारी व मे.जे.के. डेव्हलपर्स यांचे दरम्यान दि.२०/१२/१९८९ रोजी करण्यात आला होता व त्यानुसार प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला होता. करारनाम्यानुसार सोपविलेल्या मुदतीचा ३० वर्षाचा कालावधी दि.२५/१२/२०१९ रोजी संपल्यावर देखील मे.जे.के. डेव्हलपर्स यांचे संचालक/ भागीदार यांनी महानगरपालिकेच्या जागेचा ताबा न सोपविता सदरची जागा अनधिकृतपणे स्वत:च्या ताब्यात ठेवलेली आहे.

त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१ ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे आयुक्तांची खात्री पटल्यास आयुक्त यांना महानगरपालिकेच्या जागेतून व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार प्राप्त आहे. त्यानुसार जे.के.डेव्हलपर्स यांना ८१-ब ची कारणे दाखवा नोटीस दि.०५/०१/२०२१ रोजी बजविण्यात आलेली होती. त्यानुसार मे.जे.के. डेव्हलपर्स यांचेवतीने खुलासा / म्हणणे सादर करण्यात आलेले आहे. त्यातील काही ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

१) करारनामा संपल्यानंतर जो पर्यंत महानगरपालिका कायदेशिर ताबा सामनेवालाकडून प्रत्यक्ष घेत नाही तो पर्यंत अनधिकृत ताबा असे म्हणता येणार नाही.

२) करारनाम्याची मुदत दि.२५/१२/२०१९ रोजी संपणेपूर्वीच कराराची मुदत वाढून मिळावी व नविन करारनामा करुन अटी व शर्तीप्रमाणे रिन्यु करा व पुर्वीच्या कराराप्रमाणे रिन्यु करावा असा अर्ज दिलेला आहे व त्या अर्जावर महानगरपालिका जळगांव यांनी अदयाप कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्याचप्रमाणे सदरचा अर्ज महासभेत किंवा मिटींगमध्ये ठेवण्यात आलेला नाही.

३) परंतू सदरचा अर्ज महासभेपूढे ठेवलेला नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१(ब) प्रमाणे अनधिकृत ताबा नमूद करुन दिलेली नोटीस बेकायदेशिर ठरते. दिलेली नोटीस मागे घेण्यात यावी.

४) त्याचप्रमाणे Privilege amount ही कायदयाप्रमाणे मुदतीचे आत भरलेली असून त्याबाबत अर्जदार महानगरपालिका जळगांव यांनी कोणतीही तक्रार केलेली नाही. सबब अटी व शर्तीचा कोणताही भंग झालेला नाही.

५) सदर जागेवर मिनी ट्रेन, खेळण्याची साधने तयार करण्यात आलेली होती व ती आजही सुव्यवस्थित, योग्य व जागेवर आहे.

मात्र मे.जे.के. डेव्हलपर्स यांनी खालील प्रमाणे करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केलेला आहे.

१. करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार तत्कालीन नगरपालिका ठरावानुसार उक्त नमुद जागा ३० वर्षासाठी नाममात्र आकार वार्षिक रु.१०१/- प्रमाणे अटी-शर्तीच्या अधीन राहून देण्यात आलेली होती. करारनाम्यातील अट क्र.२४ नुसार

On the expiration or earlier determination of this grant, to yield & deliver peaceful & vacant possession of the premises in its entirety with all improvements, if any done hereto without any claim for compensation on that account.

मे.जे.के.डेव्हलपर्स यांनी ३० वर्षांची मुदत संपल्यानंतर जागेचा ताबा महानगरपालिकेस देणे आवश्यक होते. तसेच महानगरपालिकेची कोणतीही संमती न घेता मे.जे.के. डेव्हलपर्स यांनी ताबा कायम ठेवलेला असल्याने सदरची जागा अनधिकृतपणे त्यांच्या ताब्यात ठेवलेली आहे.

२. करारनाम्यातील अट क्र.२७ नुसार ३० वर्षाची मुदत संपण्याच्या ३ महिने आधी renewal of the grant साठी अर्ज सादर करणे बंधनकारक होते. मात्र मे.जे.के. डेव्हलपर्स यांनी कोणताही अर्ज वरिल मुदतीत महानगरपालिकेस सादर केलेला नसल्याने त्यांना नुतनीकरणाबाबत कोणताही अधिकार राहत नाही. तथापि त्यांनी सदर मुदती नंतर दिनांक २० फेब्रुवारी २०२० रोजी त्याबाबतीत अर्ज सादर केलेला आहे. त्यामुळे अट क्र.२७ चा भंग झाल्याचे दिसून येते.

३. तसेच करारनाम्यातील अट क्र.१ तसेच महानगरपालिका ठरावानुसार सदर जागेबाबत मे.जे.के. डेव्हलपर्स यांनी Privilege amount Rs.१०१/- दरवर्षी नियमित भरणे क्रमप्राप्त होते. मात्र किरकोळ वसुली विभागाकडून दि.०९/०२/२०२१ रोजी प्राप्त अहवालानुसार सदरची रक्कम नाममात्र असून देखील ती नियमित भरली नसल्याचे दिसून येते. दि.११/०८/२०१६ रोजी मागील ९ वर्षाची रक्कम रु.९०८/- व चालू वर्ष सन २०१६-१७ ची एकूण रु.१०१/- तेवढी रक्कम एकत्रित भरल्याचे दिसून येते. तसेच सन २०१९-२० या वर्षात कोणतीही रक्कम भरल्याचे दिसून येत नाही. यावरुन Privilege amount चा भरणा अगदी नाममात्र असून सुध्दा punctually & regularly केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र.१ चा भंग केल्याचे दिसून येते.

४. करारनाम्यानुसार Picnic spot विकसित करुन त्या ठिकाणी Electrically driven mini train व २ Pedal boat उपलब्ध करुन देणे गरजेचे होते, मात्र मिळकत व्यवस्थापक व प्रभाग अधिकारी समिती क्र.३ यांच्या संयुक्त पाहणी अहवालानूसार ती मागील काळापासून व सध्या देखील बंद

स्थितीत असल्याने मे.जे.के. डेव्हलपर्स यांनी करारनाम्यातील अटी-शर्तीचे उल्लघंन केल्याचे दिसून येते.

५. नगर रचना विभागाकडून दि.०८/०२/२०२१ रोजी प्राप्त अहवालानूसार करारनाम्यातील अट क्र.९ Picnic spot विकसित करण्याबाबतचे तपशिलवार प्लान इ. बाबत महानगरपालिकेस परवानगीसाठी कोणतेही दस्तऐवज मे.जे.के. डेव्हलपर्स यांनी सादर केल्याचे दिसून येत नाही.
६. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार महानगरपालिकेचे कोणतीही स्थावर मालमत्ता भाडे पट्टयाने देता येईल तो मोबदला असे अधिमूल्य भाडे किंवा अन्य मोबदला चालू बाजार भावापेक्षा कमी असता कामा नये. मात्र मे.जे.के. डेव्हलपर्स यांना सोपविण्यात आलेल्या जागेचे क्षेत्र विचारात घेता त्यासाठी ते महानगरपालिकेस देत असलेल्या मोबदला बाजार भावा पेक्षा खूपच कमी असल्याने त्याचे Grant चे नुतनीकरण करणे महानगरपालिकेच्या आर्थिक दृष्टया नुकसानकारक आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ चे उल्लघंन करणारे आहे.
७. तरी करारनाम्यातील अटी-शर्तीचे केलेले उल्लघंन व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ मधील तरतूदी विचारात घेवून मे.जे.के. डेव्हलपर्स यांचा दि.२०/०२/२०२० रोजीचा नुतनीकरणाबाबतचा अर्ज नाकारणेस तसेच कोणतीही मुदतवाढ न देता ८१(ब) नुसार सुरु असलेल्या कार्यवाहीनूसार त्यांना देण्यात आलेली जागा जळगांव शहर महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने मे.जे.के. डेव्हलपर्सकडून मुदत संपल्याच्या दिनांकापासून त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेचे आजच्या बाजार भावाप्रमाणे मूल्य ठरवून त्यावर वार्षीक ८% प्रमाणे वार्षीक भाडे व त्यावर ५% प्रमाणे व्याजासह दंड वसूल करुन तात्काळ आजच्या आज जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचा जनावरांचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी देखभाल करीता २५% पेक्षा जास्त स्वामित्व शुल्क देणाऱ्या संस्थेची नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा व महानगरपालिकेला जास्तीत जास्त रॉयल्टी कशी भेटेल, या विषयावर भर देण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या भटक्या मोकाट जनावरांना कोंडवाडा करणे कामी ५ वर्ष कालावधी करिता स्व.सौ.सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो.सेवा संस्था,मोहाडी

ता.जि.जळगांव यांना देण्यात आलेला होता. सदर संस्थेची मुदत दि.११/०९/२०१९ रोजी संपुष्टात आलेली असून सदर संस्थेकडून २२% स्वामित्व शुल्क घेण्यात येत होते.

महासभा ठराव क्रं.२१७ दि.१५/११/२०१९ नुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या भटक्या मोकाट जनावरांचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी देखभाल करिता देणेसाठी खाजगी गो-सेवा संस्थेची ई-निविदाव्दारे निवड करणेस मान्यता दिलेली होती. तसेच मागील ५ वर्षाचे रॉयल्टीचे उत्पन्न मर्यादा रुपये ३ लक्ष पेक्षा कमी असल्यामुळे ई-निविदा न मागविता दरपत्रक दैनिक लोकमतच्या वृत्तपत्रात दि.१५/०१/२०२० रोजी जाहिर सूचना प्रसिध्द करुन कोटेशन व्दारा दर मागविण्यात आले होते. परंतू त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही म्हणून दि.१२/०२/२०२१ रोजी पुन्हा फेर जाहीर सूचना प्रसिध्द केली असता दि.२४/०२/२०२० पावेतो ३ कोटेशन प्राप्त झाले.

त्यात मोरया स्वंय रोजगार सेवा सह संस्था,जळगांव हे २६% (स्वामित्व) रॉयल्टी देणार असल्याने या संस्थेच्या अंतिम निर्णयासाठी दि.२५/०८/२०२० चे स्थायी समिती समोर विषय डॉकेट व्दारा प्रस्ताव ठेवला होता. त्याकडे जळगांव शहर महानगरपालिकेचा मालकीचा जनावरांचा कोंडवाडा ३ वर्षाचे कालावधीसाठी देखभाल करिता २५% पेक्षा जास्त स्वामित्व शुल्क देणाऱ्या संस्थेची नियुक्ती करणेस महासभा ठराव क्रं.२१७ दि.१५/११/२०१९ अन्वये ३ वर्षासाठी ई-निविदेव्दारे संस्थेची निवड करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी प्रशासनाने सदर प्रकरणी जाहीर ई-निविदा न मागविता परस्पर दरपत्रक पध्दत राबविण्याचा निर्णय घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही करुन सदर प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रकरणी महासभेच्या ठरावाच्या विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात आल्याचे दिसुन येते. सबब सदर प्रकरणी ई-निविदा शक्य नसल्यास प्रशासनाने सदर बाब महासभेसमोर निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते.

महासभा ठराव क्रं.२१७ दि.१५/११/२०१९ नुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचा भटक्या मोकाट जनावरांचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी देखभाल करिता देणेसाठी खाजगी गो-सेवा संस्थेची ई-निविदाव्दारे निवड करणेस मान्यता दिलेली होती. परंतू उत्पन्न मर्यादा रुपये ३ लक्ष पेक्षा कमी असल्यामुळे प्रशासनामार्फत ई-निविदा न राबविता स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दीव्दारे दरपत्रक मागविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** कालंका माता मंदिराच्या पाठीमागील ओपनस्पेसला (आरक्षण क्र.६१ लहान मुलांचे क्रिडांगण) स्व.लतामाई रमेश बाविस्कर यांचे नांव देणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.**अश्विन सोनवणे :- अनुमोदन आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया, या डॉकेट मध्ये रस्त्यांना नांव देण्याचे विषय क्र.८,१०,१२,२१,२२,२३ हे सर्वेच विषय सारखे आहे, जवळपास हे सर्व विषय नामकरणाबाबतचे आहे. हे सर्व विषय मंजुर करुन या सर्व प्रस्तावांना मी अनुमोदन देत आहे.

**नगरसचिव :-** कुलभुषण भाऊ एकदा नंबर सांगा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय क्र.८,१०,१२,२१,२२,२३

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्व.लतामाई फॉउंडेशनच्या माध्यमातुन सदर फॉउंडेशनमधील कार्यकर्ते व स्थानिक सदस्यांनी तसेच परिसरातील नागरीकांनी मिळून कोरोना कालावधीत परिसरातील गरजू नागरिकांना धान्य वाटप, जेवणाचे पाकीट पुरविणे, संपूर्ण प्रभाग सॅनिटायझर केले, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी अर्सेनिक अल्बम च्या गोळया वाटप केल्या, मनपा कर्मचारी यांना ग्लोज, मास्क, सॅनिटायझर वाटप केले, पॉझिटिव्ह नागरिकांना जेवण दिले असे अनेक कामे सदर परिसरात करण्यांत आले.

फॉउंडेशनच्या या कामांमुळे परिसरातील सर्व नागरिक फॉउंडेशनचे कौतुक करीत असून त्यांचे आभार व्यक्त करीत आहेत व तेथील नागरिकांनी मागणी केल्यानूसार कालंका माता मंदिराच्या पाठीमागील ओपनस्पेसला (आरक्षण क्र.६१ लहान मुलांचे क्रिडांगण) " स्व.लतामाई रमेश बाविस्कर " यांचे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर ओपनस्पेसला यापूर्वी कोणाचेही नाव दिले नसलेबाबत खात्री करुन घ्यावी. तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- सोनवणे अश्विन शांताराम**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** प्र.क्रं.१५ अंतर्गत श्रीराम कन्या शाळेजवळील पुला पासून ते सार्व.शौचालया पर्यंत नाल्यास संरक्षण भित बांधणे कामी येणारा रक्कम रु.२० लक्ष मात्रचे खर्चास तसेच सदर काम नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत घेणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.१५ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे, रहदारी सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामे लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.१५ मध्ये खालील नमूद कामे नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२०/- लक्ष मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१५ श्रीराम कन्या शाळेजवळील पुला पासून ते सार्व.शौचालया पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | रुपये २० लक्ष मात्र |
| | एकूण रक्कम रु.- | रु.२०/- लक्ष मात्र |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** शिवाजी नगर च्या नविन उड्डाण पुलाचे नामकरण “श्री छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुल” असे करणेबाबत मा.महापौर, सौ.भारती कैलास सोनवणे, सन्मा.सदस्य, श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व अध्यक्ष, मराठी प्रतिष्ठान यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जनमानसांच्या भावना लक्षात घेता जळगाव शहरात शिवाजी नगर ते जिल्हा परिषद या रस्त्यावर नव्याने होणाऱ्या उड्डाण पुलाला “श्री छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुल” असे नामकरण करणेबाबतचा ठराव करुन त्याची प्रत रेल्वे प्रशासनाला पाठवावी, अशी प्रमुख मागणी मराठी प्रतिष्ठान तर्फे करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत, वीर पुरुष, जाणता राजा, वंदनीय श्रीमंत श्री छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राला लाभलेले एक सर्वात मोठे भुषण आहे. त्यांचे विचार, आदर्श, शैली नेहमी स्मरणात राहुन त्याप्रमाणे आचरण करण्यासाठी आपण नेहमी प्रयत्नात असतो. त्याकरिता शिवाजीनगरच्या नविन उड्डाण पुलाचे नामकरण “श्री छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुल” असे करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** सुप्रिम कॉलनी मेहरुण सर्व्हे क्रमांक १९४ मनपा मालकीची खुली जागा बागवान फाऊंडेशन, जळगांव यांना विकसित करणेस देणेबाबत मा.गटनेता,एम.आय.एम.,श्री.बागवान रियाज अहमद अ.करीम व अध्यक्ष, बागवान फाऊंडेशन,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** खुले जागेचे प्रत्येक विषयाला सुप्रिम कोर्टाचे जे निर्णय झालेले आहेत. त्या कायद्याच्या सर्व बाबींना बंधनकारक राहुन प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. खुल्या जागेंच्या संदर्भात.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शहरातील बागवान फाऊंडेशन या सामाजिक संस्थेतर्फे जळगांव शहरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यात येतात. शहरातील सुप्रिम कॉलनी परिसरातील महानगरपालिका मालकीचा सर्व्हे क्रमांक १९४ खुला भुखंड यापूर्वी समाजिक संस्थेस विकसित करणेकामी

देण्यात आलेला होता परंतू आजपावेतो सदर संस्थेने तो खुला भुखंड विकसित केलेला नसल्याने सदयस्थितीत सर्व्हे क्रमांक १९४ हा खुला भुखंड बखळ स्वरुपात असून परिसरातील नागरीकांना त्याचा काहीएक उपयोग होत नसल्याने सर्व्हे क्रमांक १९४ हा खुला भुखंड यापूर्वी कुणाला दिला असल्यास तो रद्द करुन बागवान फाऊंडेशन,जळगांव यांना देण्यात यावा.

बागवान फाऊंडेशन,जळगांव यांनी मागणी केलेनूसार सुप्रिम कॉलनी परिसरातील महानगरपालिका मालकीचा सर्व्हे क्रमांक १९४ हा खुला भुखंड विविध समाजपयोगी कामांसाठी विकसित करणेकामी बागवान फाऊंडेशन, जळगांव यांना मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** बजरंग बोगदा समोरील चौकास " कै.रणजित आप्पा भोईटे चौक " असे नांव देणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्य, श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांनी मागणी केलेनूसार बजरंग बोगदा समोरील चौकास " कै.रणजित आप्पा भोईटे चौक " असे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर चौकास यापूर्वी कोणाचेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** प्रभाग क्रं.११ पिंप्राळा ग.क्र.९३ खुल्या जागेस कंपाऊंड वॉलसह सुशोभिकरण करणेबाबत सन्मा. सदस्या, सौ. पार्वताबाई दामु भिल यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.पार्वताबाई भिल :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर प्रभाग क्रमांक ११ मधील हरिविठ्ठल नगर परिसरात भिलवाडा येथे पिंप्राळा शिवार गट क्र.९३ ही महानगरपालिकेची खुली जागा असून जागेस कुंपन भिंत नसल्यामुळे सदर जागा बखळ पडीत व ओसाड पडून आहे. तसेच सदर जागेत कोणत्याही सुविधा नसल्यामुळे नागरीकांना सदर जागेचा काहीच उपयोग होत नसल्यामुळे अडचणी निर्माण होत असल्याने जळगांव शहर प्रभाग क्रमांक ११ पिंप्राळा ग.क्र.९३ खुल्या जागेस कंपाऊंड वॉलसह व अबाल वृध्दांसाठी खेळणी, बाके बसविण्यासह सुशोभिकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- भिल पार्वताबाई दामु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** प्रभाग क्रं.११ मधील नाथ समाज व भिल समाजाच्या दफन भूमीस संरक्षण भिंतीसह इतर सुविधा पुरविणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.पार्वताबाई दामु भिल यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.पार्वताबाई भिल :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर प्रभाग क्रमांक ११ मधील हरिविठ्ठल नगर परिसरात नाथ समाज तसेच भिल समाजाची दफन भूमी स्थित असून सदर जागेस कुंपन भिंत नसल्यामुळे सदर जागा बखळ, पडीत व ओसाड पडून आहे. तसेच सदर ठिकाणी यासंबंधी कार्यक्रमांसाठी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे नागरीकांना अडचणी निर्माण होत असल्याने जळगांव शहर प्रभाग क्रमांक ११ मधील हरिविठ्ठल नगर परिसरातील नाथ समाज तसेच भिल समाज दफन भूमी या दोन्ही परिसरास कुंपन भिंत, दोन्ही बाजुस गेट बसवुन तेथे बोअरवेल करुन पंपासह टाकी व नळ बसवुन पाण्याची व्यवस्था करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- भिल पार्वताबाई दामु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** प्र.क्र.३ महर्षि वाल्मिक नगर उदयान येथे उपलब्ध मोकळया जागेत पुर्वीप्रमाणे मनपा संचलित दवाखाना उभारणे बाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.रंजना सपकाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३ अंतर्गत महर्षि वाल्मिक नगर बगीचा परिसरात यापुर्वी महानगरपालिका संचलित शहीद अमर शेख दवाखाना स्थित होता, त्याव्दारे या परिसरातील गोरगरीब नागरीक, महिला वर्ग यांना वैदयकिय सुविधेसह बाळांसाठी लसीकरण यासम सेवा पुरविण्यात येत होत्या. मात्र सदर दवाखाना बऱ्याच कालावधी पुर्वीचा कालबाहय झाल्यामुळे निष्कासित करण्यात आलेला आहे. परिणामी या परिसरातील बहुसंख्य गोरगरीब नागरीकांना दवाखान्या अभावी वैदयकीय सुविधांचा लाभ घेता येत नसल्याने बहुसंख्य गोरगरीब, मजुर वर्गीय असलेल्या या प्रभागात पुर्वीप्रमाणे महर्षि वाल्मिक नगर बगिच्यातील उपलब्ध असलेल्या मोकळया जागेत मनपा संचलित दवाखाना उभारुन नागरीकांना वैदयकीय सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सपकाळे रंजना भरत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १६)** हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल चौक स्वखर्चाने सुशोभिकरण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत अध्यक्ष,श्री संत सेना नाभिक हितवर्धक संघ, जळगांव शहर संघटना यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, भारतीय स्वातंत्र्य लढयात हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल यांचे मोठे योगदान होते. इंग्रजांना स्थानिक पातळीवर जेरीस आणणारे असे बॅ.वीरभाई कोतवाल यांचेवर दि. २ जानेवारी १९४३ रोजी सिध्दगड ता.मुरबाड जि.ठाणे (महाराष्ट्र) येथे इंग्रज अधिकाऱ्याने गोळीबार केला त्यात हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल यांना विरमरण आले.

माथेरान व सिध्दगड ता.मुरबाड या ठिकाणी दरवर्षी दि.२ जानेवारीला शासनाच्या स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातुन हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल यांची जयंती व पुण्यतिथीचे मोठया प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते त्या ठिकाणी मुरबाडच्या आजुबाजूच्या परिसरातील कल्याण, ठाणे, रायगड, बदलापूर, भिवंडी इत्यादी ठिकाणाहून मोठया संख्येने मशाल रॅलीचे आयोजन करण्यात येते.

हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल हे नाभिक समाजाचे असून समाजासाठी ते वीर तथा आदर्श व्यक्तीमत्व आहेत. हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल यांची जयंती व पुण्यतिथी ही हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल चौक, (ॲक्सीस बँक मेन ब्रँच) जळगांव समोर गेल्या ४० वर्षापासून साजरी करीत आहे. सदरील हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल चौकाच्या सुशोभिकरणाचा खर्च श्री संत सेना नाभिक हितवर्धक संघ,जळगांव शहर संघटना करण्यास तयार असल्याने व त्यांचे मागणीनूसार स्टेशन रोड, ॲक्सीस बँक समोरील

हुतात्मा बॅ.वीरभाई कोतवाल चौक स्वखर्चाने सुशोभिकरण करणेकामी श्री संत सेना नाभिक हितवर्धक संघ, जळगांव शहर संघटना यांना मनपा चे अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १७)** ३२ वी किशोर / किशोरी गट राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी अनुदान मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.नितीन मनोहर बरडे, सरकार्यवाहक, जळगांव जिल्हा कबड्डी असोसिएशन यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.**कैलास सोनवणे :- फक्त साहेबांना विनंती आहे की, सर्व नियम पाहुन रु.५ लाख मंजुर करावे.

**नगरसचिव :**- किती.

**श्री.कैलास सोनवणे :-** रु.५ लाख

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ३२ वी किशोर / किशोरी गट २०२१-२०२२ या वर्षाचा महाराष्ट्रात मानाची समजली जाणारी ३२ वी किशोर / किशोरी राज्य अजिंक्यपद व निवडचाचणी कबड्डी स्पर्धा घेण्याचा मान यावर्षी जळगांव जिल्हा कबड्डी असोसिएशनला मिळाला असून जिल्हा कबड्डी असोसिएशन तर्फे या स्पर्धेचे ५ ते ८ मार्च २०२१ दरम्यान आयोजन करण्यात येणार आहे.

स्पर्धांसाठी विदर्भ वगळता महाराष्ट्रातील २५ जिल्हयांचे किशोर / किशोरी संघ सहभागी होणार असुन पदाधिकारी, अधिकारी, पंच जळगांव येथे मुक्कामी येणार असुन त्यांच्या निवासाची, भोजनाची, मैदानाची व वाहतुकीची व्यवस्था जिल्हा कबड्डी असोसिएशनला करावी लागणार आहे.

यां स्पर्धेसाठी मोठया प्रमाणावर खर्च येतो व आर्थिक मदती शिवाय ही स्पर्धा यशस्वी होऊ शकत नसल्याने ३२ वी किशोर / किशोरी गट राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी जळगांव जिल्हा कबड्डी असोसिएशन यांना महापालिका निधीतुन रक्कम रु.५,००,०००/- मात्र अनुदान देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १८) महापालिकेच्या जागेवरील १ ते ८९ विकास दुध बुथ विक्री केंद्रांना मुदतवाढ देण्यास परवानगी मिळणे बाबत कार्यकारी, संचालक, जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.**

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.सुनिल खडके :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त साहेबांना एक प्रश्न विचारायचा होता या संदर्भात की, मागील काळात देखील असे अनेक प्रस्ताव आलेले होते. त्या वेळेस प्रशासनाची भुमिका अशी होती की, आपण ते नाकारलेले आहे प्रस्ताव नव्याने जे आहेत ते. आणि ह्या सर्व जुन्या परवानग्या आहेत. मग एकीकडे आपण नविनला नाकारत आहोत. विषय अतिक्रमणचाच आहे. म्हणजे रस्त्यांवर लोकांना वाहतुकीला अडथळा असेल किंवा त्रासदायक ठरत असेल म्हणुन आपण या सर्व गोष्टींना आपण नाकारत आहोत नव्याने आणि हे जुने जे आहेत यांना रिनिवल करण्यासाठी आपण काय भुमिका घेणार आहोत. नविन किंवा हे विषय तेच आहे अतिक्रमणचाच आहे रस्त्यांवर अडचणींचाच आहे. या संदर्भात प्रशासनाची भुमिका काय आहे.

**मा.आयुक्त :-** यापुर्वी आपण बऱ्याच जागा नागरीकांच्या मागणीवरुन किंवा सदस्यांच्या मागणीवरुन रस्त्यावरच्या काही जागा आपण या दुध बुथसाठी दिलेल्या आहेत. हा विषय दोन तिन वर्षापुर्वी जेव्हा महासभेसमोर आलेला होता. त्यावेळेला आपण त्यांना मुदतवाढ देण्याचा ठराव केलेला होता. परंतु रस्त्यावरच्या जागा हे अश्या पध्दतीने व्यवसायला देणे हे नगररचनेच्या नियमाप्रमाणे योग्य नाही. दुसरी गोष्ट व्यवसायला कोणत्याही प्रकारची जागा द्यायला म्हटल तर ती केवळ लिलाव पध्दतीनेच देता येतील. केवळ त्यांच्या मागणीनुसार आपल्याला देता येणार नाही. हे दोन कारणासाठी आपण त्यावेळेला हे ठराव तत्कालीन आयुक्तांच्या सुचनेप्रमाणे राज्य शासनाकडे कलम ४५१ खाली निर्णयासाठी पाठविलेले होते. मागच्या दोन महिन्यापुर्वी राज्य शासनाने हे सर्व ठराव नियमाला धरुन नाही. महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतुदीच्या विरोधात असल्यामुळे ते ठराव निलंबीत केले. त्यामुळे आपल्याला अश्या प्रकारची मुदतवाढ देता येणार नाही. या पार्श्वभुमीवरती मागच्या काही महासभांमध्ये नविन दुध बुथचे ठराव आपण केलेले होते. जर मुदतवाढच आपण देऊ शकत नाही तर नविन बुथलाही जागा आपल्याला देता येणार नाही. दुसरी गोष्ट या महासभेच्या संदर्भामध्ये बऱ्याच जागा अश्या अर्जदारांच्या मागणी वरुन आपण काही संस्थांना विकसीत करायला देतो. याच्याबाबतीमध्ये आपण एक सर्व सन्मा.सदस्यांनी हा एक मुद्दा विचारात घ्यावा माझी अशी विनंती राहील की, महानगरपालिकेच्या कोणत्याही जागा, कश्याही पध्दतीने हस्तांतरीत करायची असतील तर त्याला कलम ७९ हे लागु होत. त्याच्या खाली आता शासनाने केलेले जे नियम आहे ते लागु होतात. कोणतीही जागा हस्तांतरीत करत असतांना आपल्याला महानगरपालिकेच आर्थिक हित विचारात घेता, बाजार भावापेक्षा कमी दराने आपण देऊ नये. लेआऊट मधल्या ज्या खुल्या जागा आहे ते जर हस्तांतरीत करायच्या असल्यास लेआऊट वरील खुली जागा काही महानगरपालिकेच्या मालकीची असत नाही. त्या लेआऊट मधील जे प्लॉट धारक आहे त्यांच्या मालकीची असते. आपण फक्त त्याच्यामध्ये जी जागा आहे त्या जागेचे कस्टोडीयन असतो. ओनर नाही आहेत. कायद्यामध्ये टाऊन प्लॅनींग मध्ये अस म्हटलेले आहे The land which is waste on Municipal Corporation अस म्हटलेल आहे. wasting आणि Ownership याचे लिगल मिनींग वेगवेगळे आहे. आता अश्या परिस्थिती मध्ये जो पर्यंत त्या प्लॉटस मधील नागरीक किंवा प्लॉट धारक किंवा त्यांची जर फॅरमल असोसीएशन झाली असेल ते समोर येऊन ती जागा विकसित करणेसाठी महानगरपालिकेला मागत असतील तर त्यांना पहिल प्राधान्य त्या प्लॉट धारक आहे त्यांच्या संघटनेला राहील. समजा जर काही प्लॉट धारकांच्या तयार नसतील तर महानगरपालिका स्वत: ती जागा विकसित करुन देते. परंतु अश्या बऱ्याच खुल्या जागा ज्या कारणासाठी वापरता येतील त्या कारणावयतिरिक्त आपण त्या अन्य कारणासाठी दिलेल्या आहे. आता याच्या संदर्भामध्ये खुली जागा लिलावा मध्ये देण्याची सुध्दा कायद्या मध्ये तरतुद आहे. याच्या संदर्भामध्ये आपल्या महानगरपलिकेच्या संदर्भामध्ये आपल्या महापालिकेच्या नावाने ७७३० जे हायकोर्टामध्ये रिटपिटीशनझालेल होत. ज्याचा निकाल सन २०१८ मध्ये आदरणिय औरंगाबाद उच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्याच्या मध्ये स्पष्ट सुचना महानगरपालिकेला दिलेल्या आहे. कोणतीही जागा तुम्हाला व्यावसायाला द्यायची असतील तर ती अर्थातच लिलाव

पध्दतीने दिली पाहिजे. लिलाव याचा अर्थ असा होतो की, जो कोणी इच्छिुक असतील त्यांना सर्वांना समान संधी, जे घटनेच कलम १७ आहे.सर्वांना समान संधी हे या ठिकाणी लागु होतो हे अस उच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटलेल आहे. अर्थात हे ही उच्च न्यायालयाने म्हटलेल आहे. काही जागा जर सार्वजनिक कामासाठी तुम्हाला द्यायायची असणार. उदा.काही वैद्यकीय दवाखाना सुरु करायचा आहे, हॉस्पीटल चालु करायच आहे. किंवा शिक्षण संस्था आपल्याला चालवायची असेल. किंवा इतर काही संस्थांना कामासाठी जागा द्यायची असेल विशेष काही धर्मासाठी काम करणाऱ्या संस्था आहे. धर्मदाय कायद्याखाली झालेल्या जे काही संस्था आहे. अश्या संस्था बिगर लिलावाने घेऊ शकता मात्र त्याच्यासाठी महासभेने एक धोरण निश्चित केल पाहिजे. त्या धोरणाला अनुसरुन आपण आपल धोरण वर्तमानपत्रातुन सर्वांसाठी खुले केले पाहिजे. उदा. महानगरपालिकेची एखादी खुली जागा ही जर आपल्याला शिक्षण संस्थेला द्यायायची आहे. किंवा क्रिडांगण म्हणुन एखाद्याला विकसित करायला द्यायायची आहे. अश्या वेळेला महानगरपालिकेनी या जागा हस्तांतरणाची अटीशर्ती म्हणजे धोरण निश्चित केल पाहिजे. त्याला वाईड पब्लीसिटी दिली पाहिजे. अश्या प्रकारच्या पात्र असणाऱ्या संस्थांकडुन आपण अर्ज मागविले पाहिजे आणि त्याच्या मधुन आपल्याला म्हणजे महासभेला जी संस्था अधिक योग्य वाटेल आणि जी आपल्या अटीशर्तीला पात्र ठरेल आणि जी संस्था आपल्या जागेचा अधिक वापर करुन घेत असेल त्या संस्थेला आपण पारदर्शक पध्दतीने जागा दिली पाहिजे. बऱ्याच वेळेला आपण अस करतो की, एक खुली जागा आहे, अर्ज येतो आणि त्या अर्जाची आपण महासभेत मान्यता घेतो. उच्च न्यायालयाच्या ७७३० नंबरच्या रिटपिटीशन मध्ये दिलेल्या ज्या सुचना आहे आदेश आहे त्याच भंग करणारा ठरेल. त्यामुळे आपल्याला माझी विनंती अशी राहिल की, ही जी प्रक्रिया आहे. ही आपल्याला पारदर्शक पध्दतीनेच राबविली पाहिजे. या व्यतिरिक्त जर आपण अश्या काही मुदतवाढ द्यायच म्हटल तर अश्या पध्दतीने ठरावाची अंमलबजावणी करणे अतिशय अडचणीच होणार आहे.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा, आपण याबाबत सविस्तर खुलासा केला पण त्याचा विषय आपला दुसरीकडे गेला. त्याच कारण अस आहे की, आपण खुल्या जागा संदर्भात किंवा महापालिकेच्या खुल्या जागा संदर्भात आपण माहिती दिली. आपला विषय दुध बुथ केंद्राचा आहे. आणि मुळात आपण जी माहिती दिली त्यात आपण अस नमुद केलेल आहे की, लिलाव पध्दतीने दिल पाहिजे असा नियम आहे. पण आपण जी दुध बुथला परवानगी देतो. ते आपण रस्त्यांवर देतो. मग रस्त्यावर आपण लिलाव करुन जागा देऊ शकतो का ? कुठल्याही दुध बुथला किंवा कुठल्याही व्यवसायला. दुसरा भाग याच्यात असा आहे की आपण मा.वाहुळे साहेब असतील किंवा प्रशासन असेल गेल्या काही काळामध्ये अतिक्रमणासंदर्भात आपण ज्या पध्दतीने कार्यवाही करत आहोत.शहर सुटसुटीत असल पाहिजे शहरात सर्व व्यवस्थीतपणा शहरात असला पाहिजे. त्या संदर्भात आपण गरीब हॉकर्स यांना रस्त्यावर अतिक्रमणाची कार्यवाही करुन हे करत आहोत त्यांना आपण एकीकडे ही कार्यवाही करायची आणि दुसरीकडे दुध बुथ सारख्या गोष्टींना परवानगी द्यायची. हे देखील चुकीच आहे अस मला वाटत. दुसरा विषय जे दुध बुथ केंद्र आहे. मला कोणत्याही व्यक्तीच्या व्यवसायाबद्दल किंवा त्याच्या पोटभरण्यावर ऑब्जेक्शन नाही. आक्षेप नाही. पण दुध बुथ केंद्रांला परवानगी देतांना त्याचे काही नियम असतात. त्यांना तेथे कुठला व्यवसाय करायचा आहे. आज जर आपण सर्व्हे केला तर दुधबुथ केंद्रावर कुठले व्यवसाय होतात आणि तेथे काय विकल जात. आणि काय काय प्रकार घडतात. आपल्याला माहिती मिळेल आपण जर सविस्तर खोलात गेल तर. दुसरा विषय याच्यात असा आहे की, ज्या परवानग्या आपण पुर्वी दिलेल्या आहेत दुधबुथ केंद्राला त्या व्यतिरिक्त देखील परवानगी न घेता, जस नव्याने परवानगी द्यायला आपण नाकारतो, आपण देत नाही आता नव्याने परवानगी, पण जे जुन्या परवानग्या दिलेल्या आहेत. त्या खेरीज अनेक ठिकाणी आपल्याला असे बुथ आढळतील ज्यांच्या परवानग्या नाही. पण आपल्याला अस वाटत की, यानी महापालिकेची परवानगी घेतलेली आहे. असे अनेक बुथ आपल्याला सापडतील. त्यांनी परस्पर तेथे बुथ लावलेले आहेत. या संदर्भात प्रशासनाने योग्य ती भुमिका जाहिर केली पाहिजे. अस मला वाटत.

**मा.आयुक्त :-** कोणाच्या मनात शंका असेल ती काढावी. नागरीकांना दुधांची विक्री आणि दुधाची उपलब्धता सहजतेने व्हावी अश्या दृष्टीने त्या दुध बुथ केंद्रांना जागा दिल्या असतील. परंतु जर आज वस्तुस्थिती आपण जाऊन पाहिल तर दुधासोबतच तेथे अन्य प्रकारचे मोठ मोठे व्यवसाय सुरु आहे. फक्त दुध केंद्र ते राहिलेल नाही. आता मुंबईला जर आपण बघितल तर बऱ्याच ठिकाणी आपल्याला आरे सरिता केंद्र दिसतात पण तेथे फक्त आणि फक्त

दुध विक्री केली जाते. आणि दुसरी कुठल्याही प्रकारची विक्री नाही. आपल्याकडे मात्र परिस्थिती वेगळी आहे. दुसरा मुद्दा आपण जो उपस्थित केलेला होता की, रस्त्यावरचे अतिक्रमण आपण काढत आहात तर अशी रस्त्यावरची जागा आपल्याला देता येईल का ? आता तुम्ही सुरुवातीलाच सांगितले प्रमाणे रस्त्यावरची जागा ही कुठल्याही परिस्थितीमध्ये व्यवसायाला भाडेपट्टयाने देता येणार नाही. फक्त रस्त्यावर व्यवसाय करणारे जो फेरीवाल्यांचा विषय आहे. त्याच्यासाठी जो सुप्रिम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे सन २०१४ मध्ये केंद्र शासनाने जो कायदा केलेला आहे फेरीवाला. त्याच्यामध्ये फेरीवाल्याच्या व्याख्यामध्ये बसणारे लोकांना जे रस्त्यावरती, नगरपालिकेना ठरवुन दिलेला हॉकर्स झोन नो हॉकर्स झोन आणि रिस्ट्रीक्टेड हॉकर्स झोन या धोरणाला अनुसरुनच व्यवसाय करता येईल. कायम स्वरुपी कुठलीही जागा आपल्याला भाडेपट्टयाने देता येणार नाही. कारण त्याच्यामध्ये एक बेसीक नियम असा आहे की, कुठलीही जागेचा वापर विकास योजनेशी विसंगत करता येतो. एखादी जागा जर त्यांना रिवर्ट करायची असेल तर आपण त्यांना नाकारतो की, तु या ठिकाणी व्यवसाय करु शकत नाही. कारण ती रेसिडेंशियल पर्पजची जागा आहे. व्यवसायिक जागा असेल तर आपण तेथे इंडस्ट्रीयल ॲक्ट वापरतो म्हणजे कुठल्याही जागेचा वापर जो आहे हा विकास योजनेला अनुसरुनच घेतला पाहिजे. अश्या रस्त्यातील जागेचा आपण विकास योजनेशी विसंगत वापर करणे नियोजन प्राधिकरणाच्या नात्याने योग्य होणार नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव यांनी दिलेल्या यादीनुसार महापालिकेच्या जागेवरील खालील नमूद १ ते ८९ विकास दुध बुथ केंद्रास खालील अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | केंद्राचे नांव | केंद्रचालकाचे नांव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | गुजराल पेट्रोल पंप | सौ.वंदना किशोर साळुंखे | गुजराल पेट्रोल पंपा समोर |
| २ | पिंप्राळा चौक | श्री.रविंद्र रामकृष्ण बारी | शिवाजी चौक,पिंप्राळा |
| ३ | खोटे नगर | सौ.ललिता अनिल सुरळकर | खोटे नगर स्टॉप |
| ४ | सुरक्षा नगर | श्री.प्रमोद ज्ञानदेव महाजन | सुरक्षा नगर पाण्याच्या टाकीजवळ |
| ५ | हिराशिवा कॉलनी | श्री.जगदिश भाऊराव पाटील | हिराशिवा कॉलनी परिसर पाण्याची टाकी |
| ६ | नवी पेठ | श्री.हेमंत आबाजी निकम | नवी पेठ युनियन बँकेजवळ |
| ७ | गोलाणी मार्केट | श्री.राजेश साहेबराव पाटील | गोलाणी मार्केट |
| ८ | विसनजी नगर | श्री.रविंद्र दिनकर असोदेकर | बालगंधर्व नाटयगृह शेजारी |
| ९ | गणेश वाडी | श्री.अशोक मदनलाल पांडे | डॉ.भालोदे यांच्या दवाखान्या समोर |
| १० | सिंधी कॉलनी | सौ.बेबीबाई हंबीरराव देशमुख | सिंधी कॉलनी चौक |
| ११ | अजिंठा चौफुली | श्री.विजयकुमार शंकरलाल मालपाणी | अजिंठा चौफुली सुझुकी शोरुम समोर |
| १२ | एम.आय.डी.सी. | सौ.मिनाक्षी सुभाष पाटील | के.के.कॅन शेजारी |
| १३ | म्हाडा कॉलनी | श्री.अनिल राजमल कासट | राका फर्निचर जवळ |
| १४ | पिंप्राळा गेट | श्री.विशाल अरुण मंडोरे | पिंप्राळा रेल्वे गेट पिंप्राळा रोड |
| १५ | ढाके कॉलनी | सौ.संगिता कैलास विसपुते | दक्षता नगर शेजारी |
| १६ | मित्र नगर | वैशाली जितेंद्र सरोदे | मित्र नगर,ख्वॉजामिया दर्गा जवळ |
| १७ | प्रगती विदया मंदीर | श्री.जय एकनाथ पाटील | प्र.वि.मंदीर शाळे समोर |
| १८ | गणेश कॉलनी १ | श्री.पंकज प्रकाश वराडे | गणेश कॉलनी,रिक्षा स्टॉप शेजारी |
| १९ | श्रीकृष्ण कॉलनी | सौ.संध्या जयवंत निकम | अशोक बेकरीच्या मागे,बजरंग पुल रोड |
| २० | शिव कॉलनी १ | श्री.चंद्रकांत पांडुरंग चौधरी | शिव कॉलनी स्टॉफ जवळ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | रिंग रोड १ | सौ.विजया प्रकाश चव्हाण | जे.डी.सी.सी.बँक गेट जवळ |
| २२ | बहीणाबाई | श्री.आनंद अमृत बडगुजर | महाराणा पुतळयासमोर बहिणाबाई उदयाना शेजारी |
| २३ | भोईटे शाळा | श्री.देविदास रामचंद्र चौधरी | भोईटे शाळे जवळ |
| २४ | आस्वाद | श्री.दिपक एकनाथ पाटील | एम.जे.कॉलेज जवळ |
| २५ | गेंदालाल मील | शेख गयासोद्दीन शेख चिराकोद्दीन | गेंदालाल मिल मेन रोड लगत |
| २६ | जिल्हा परिषद | श्री.प्रेमल बाबुभाई पटेल | जिल्हा परिषद जवळ |
| २७ | बळीराम पेठ १ | श्री.सुनिल रतनलाल तांबी | बळीराम पेठ चौक |
| २८ | बजरंग पुल | सौ.कविता राकेश पाटील | प्रेम नगर स्टॉप बजरंग बोगदया जवळ |
| २९ | भिलपुरा | श्री.नारायण नामदेव वाणी | भिलपुरा पोलीस स्टेशन जवळ |
| ३० | खडके चाळ | सौ.पुजा राजेश जोशी | खडके चाळ मेन रोड लगत |
| ३१ | शिवाजी नगर १ | श्री.पवन विष्णुलाल तिवारी | टि.टि.साळुंखे चौक |
| ३२ | शिवाजी नगर २ | श्री.दिव्येश सुनिल चौधरी | शिवाजी नगर शाळेजवळ |
| ३३ | सेवाश्रम | श्री.अनिल शंकर शिंदे | व.वा.वाचनालय जवळ |
| ३४ | शास्त्री चौक | सौ.कोकीळाबाई प्रकाश पाटील | शहर पोलीस स्टेशन जवळ |
| ३५ | नेहरु चौक | श्री.मनिष शांताराम जोगी | नेहरु चौक जवळ |
| ३६ | जोशी कॉलनी | श्री.ज्ञानेश्वर काशिनाथ खंबायते | जोशी कॉलनी पाण्याच्या टाकी जवळ |
| ३७ | वालेचा मार्केट | श्री.सागर बंकटराव पाटील | सिंधी कॉलनी, अमृतकर किराणा जवळ |
| ३८ | नटराज | सौ.सुरेखा राजु पाटील | नटराज टॉकी समोर |
| ३९ | लुंकड टॉवर | श्री.बविता जितेंद्र प्रजापती | मोठया पोस्टा समोर |
| ४० | पत्रकार कॉलनी | श्री.किरण शामराव भामरे | पत्रकार कॉलनी समोर |
| ४१ | स्वातंत्र चौक | श्री.सुनिल उत्तमराव पाटील | जि.प.अध्यक्ष बंगल्या शेजारी |
| ४२ | महादेव मंदीर | श्री.प्रमोद प्रकाश सानप | महादेव मंदीराजवळ मेहरुण |
| ४३ | रामेश्वर कॉलनी १ | सौ.विदयाबाई देविदास सुर्यवंशी | रामेश्वर कॉलनी, श्रीराम हायस्कूल शेजारी |
| ४४ | अक्सा नगर | शेख निसार शेख युसुफ कुरेशी | म.न.पा. मुलतानी दवाखान्याजवळ अक्सानगर |
| ४५ | शनिपेठ ३ | सौ.स्मिता सुधाकर दशपुत्रे | बळीराम मंदीर शनिपेठ |
| ४६ | भारत पेट्रोलियम | श्री.दिलीप संतोष जगताप | गुरांच्या बाजारा जवळ |
| ४७ | एम.जे.कॉलेज | सौ.सुनंदा प्रकाश भावसार | एम.जे.कॉलेज कंपाऊंडला लागुन |
| ४८ | ऑफिसर क्लब | सौ.मिराबाई राजेंद्र मौर्या | गिरणा पाणी टाकी शेजारी |
| ४९ | भुषण कॉलनी | सौ.कामेश्वरी प्रशांत भंगाळे | अभ्युदय नागरी पतपेढी जवळ |
| ५० | रामानंद नगर २ | श्री.प्रमोद प्रभाकर धर्माधिकारी | रामानंद पोलीस चौकी जवळ |
| ५१ | ओंकारेश्वर मंदीर | श्री.जयराम तोताराम पाटील | कलेक्टर बंगल्याजवळ |
| ५२ | महाबळ कॉलनी | सौ.कविता सतिष पाटील | जळगांव पिपल्स बँक शेजारी पोलीस चौकी जवळ |
| ५३ | आनंद नगर | सौ.सिमा हसमुख सुर्यवंशी | आनंद नगर मोहाडी रोड लगत |
| ५४ | शिरसोली नाका | अब्दुल सत्तार अ.रहेमान पटेल | शिरसोली नाक्या डि-मार्ट समोर |
| ५५ | भवानी पेठ | श्री.तुषार सुरेश तारकस | बोहरा मस्जीद जवळ |
| ५६ | बी.जे.मार्केट | श्री.विजय सिताराम नागला | नवीन बी.जे.मार्केट |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७ | मुक्तांगण | सौ.मिनाक्षी सतीष महाजन | रामदेव बाबा मंदीराच्या मागे |
| ५८ | कालिका माता मंदीर | श्री.संजय देवराव पाटील | कालिका मंदीर,जुना नशिराबाद रोड |
| ५९ | मानराज पार्क | श्री.देवेंद्र बाबुराव बडगुजर | मानराज शेजारी |
| ६० | ट्रान्सपोर्ट नगर | श्री.राजेश रावण पाटील | झुणका भाकर केंद्राजवळ |
| ६१ | शनिपेठ २ | श्री.चंद्रशेखर सोनु बारी | शनी मंदीरा जवळ |
| ६२ | नेरी नाका | श्री.किरण विठ्ठल पाटील | अण्णाभाऊ साठे पुतळयाजवळ |
| ६३ | भगवान नगर | श्री.दिलीप केशव नेमाडे | भगवान नगर |
| ६४ | मायादेवी कॉर्नर | श्री.पंकज मुरलीधर पाटील | मायादेवी मंदीर जवळ |
| ६५ | डि.एस.पी.चौक | श्री.अमित विजय महाजन | भाऊचे गार्डनला लागुन डि.एस.पी.चौक परीसर |
| ६६ | एम.जे.कॉलेज रोड | श्री.प्रमोद शांताराम सावदेकर | एम.जे.कॉलेज रोड लगत |
| ६७ | न्यु.बस स्टँड | सौ.शशिकला भिमराव महाले | न्यु बस स्टँड समोर |
| ६८ | बालक मंदीर | सो.इंदू अरुण पाटील | रिंग रोड, जैन शाळेच्या बाजुला |
| ६९ | श्रीराम समर्थ दुध केंद्र | सौ.रेखा अनिल पाटील | संत गाडगेबाबा चौक |
| ७० | ट्रॉफिक गार्डन | श्रीमती आश्लेषा दुर्गादास ठाकुर | ट्राफिक गार्डन जवळ |
| ७१ | सिव्हील हॉस्पीटल | आरती जय ढंढोरे | सिव्हील हॉस्पीटल गेटजवळ |
| ७२ | ब्रुकबाँड कॉलनी | श्री.पंडीत बाबुराव पाटील | बहिणाबाई गार्डन जवळ |
| ७३ | ओम साई केंद्र | सौ.वर्षा महेंद्र राणा | सिध्दीविनायक सिल्क मिल्स,पिंप्राळा रोड |
| ७४ | दत्त मंदीर | श्री.प्रसाद पुरुषोत्तम कुलकर्णी | आकाशवाणी दत्त मंदीर जवळ |
| ७५ | आर.टी.ओ.ऑफीस | सौ.योगिता दिपक भारोटे | आर.टी.ओ. गेटला लागुन |
| ७६ | पोलन पेठ २ | सौ.रुपाली दिलीप चौधरी | दाणा बाजार अन्नदाता हनुमान जवळ |
| ७७ | आय.एम.आर.कॉलेज | श्री.रणजित रणछोड काळे | मुलींचे आय.टी.आय.च्या बाजुला |
| ७८ | पांडे चौक | श्री.विजय श्रीराम पवार | मोठया पोष्टाजवळ |
| ७९ | दायमा शाळा | श्री.भगवान श्रीराम जैतकर | दायमा शाळेजवळ |
| ८० | साने गुरुजी | श्री.हरीष प्रल्हाद बडगुजर | साने गुरुजी रुग्णालय जवळ |
| ८१ | सागर पार्क | श्री.दिलीप जगन तुळसकर | सागर पार्क महाबळ रोड |
| ८२ | कोल्हे नगर | श्री.मनोज तुकाराम माळी | कोल्हे नगर १०० फुटी रोड लगत |
| ८३ | आदर्शनगरप्रिन्स मिल्क | श्री.पंडीत भोमा सपकाळे | आदर्शनगर मोहाडी रोड पेट्रोल पंपाजवळ |
| ८४ | ओम कॉर्नर | श्री.निवृत्ती भाऊराव महाजन | गुळवे शाळेजवळ |
| ८५ | निर्मल कॉर्नर | श्री.राजेश मुरलीधर वारके | भुषण कॉलनी रोड,पाण्याच्या टाकीजवळ |
| ८६ | बॅरीस्टर चौक सागर पार्क | श्री.धनंजय लक्ष्मण पाटील | बॅरिस्टर निकम चौक,सागर पार्क कॉर्नर |
| ८७ | अथर्व दुध केंद्र | श्री.प्रमोद वसंतराव मोराणकर | एकलव्य क्रिडा संकुल एम.जे.कॉलेज मागील बाजु |
| ८८ | उतुंग कॉर्नर | सौ.शालीनी सुभाष सोनवणे | जुना निमखेडी रोड,हायवे दर्शन कॉलनी रोड |
| ८९ | मायमाऊली मिल्क कॉर्नर | श्री.पृथ्वीराज आत्माराम सोनवणे | हॉटेल रॉयल पॅलेस समोर, महाबळ रोड जळगांव. |

**अटी-शर्ती :,**

१) दुध बुथ केंद्रामध्ये दुध व दुधजन्य पदार्थ, बिस्कीट,खारी, टोस्ट व पाणी बोटल विक्रीस ठेवता येतील त्या व्यतिरिक्त तंबाखू, गुटका, सिगारेट तसेच अंमली पदार्थ व इतर पदार्थ आढळल्यास मुदतवाढ रद्द करण्यात येईल.

२) दुध बुथ केंद्रधारकाने दुध बुथ केंद्रापासुन कोणत्याही प्रकारे रहदारीस अडचण निर्माण होणार नाही याबाबतचे प्रमाणपत्र शहर वाहतुक विभागाकडून प्राप्त करुन म.न.पा.कडेस देणे बंधनकारक राहिल.

३) उपरोक्त नमुद १ ते ८९ विकास दुध बुथ केंद्रास ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील अटी शर्तीची पुर्तता करुनच सदर दुध बुथ केंद्रास मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १९)** विरोधी पक्षनेता यांचेसाठी नविन वाहन खरेदी करणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विरोधी पक्षनेता यांचेसाठी नविन वाहन खरेदी करणेबाबतचा सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेता यांना नागरीकांच्या तक्रारी बाबत प्रभाग निहाय कामकाजा करीता शहरात विविध भागात फिरावे लागत असल्याने प्रशासनाने विरोधी पक्षनेता यांचे वापराकरीता असलेले नादुरुस्त वाहन तात्काळ दुरुस्त करुन ते विरोधी पक्षनेता यांचे वापराकरिता अदयावत करुन देणेची कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २०)** प्रभाग क्र.१९ मधील सुप्रिम कॉलनीतील गट नं.१६६/२+३ ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत मा.सभापती, स्थायी समिती,श्री.राजेंद्र झिपरु पाटील व प्रभाग समिती सदस्य, श्री.विठ्ठल मगन पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१९ मधील सुप्रिम कॉलनीतील गट नं.१६६/२+३ ओपन स्पेस मध्ये परिसरातील जेष्ठ नागरीक व लहान थोर मंडळी नियमित येत असल्याने प्रभाग क्र.१९ मधील सुप्रिम कॉलनीतील गट नं.१६६/२+३ ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २१)** शिवकॉलनी प्रवेशव्दारास " श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार " असे नांव देणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री. कुलभुषण पाटील :-** माझे अनुमोदन आहे

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिव कॉलनी, आशाबाबा नगर व आर.एम.एस.कॉलनी भागातील नागरीकांच्या मागणीनूसार लोकवर्गणीच्या सहाय्याने प्रभाग क्रं.७ मधील शिवकॉलनी भागात प्रवेशव्दाराचे बांधकाम करणेस व सदरच्या प्रवेशव्दारास " श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार " असे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २२)** शिवकॉलनी भागातील शाळा क्र.५७ मध्ये " आदयकवी महर्षी वाल्मीक " वाचनालय सुरु करणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री. किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र. ७ मधील शिवकॉलनी भागात महानगरपालिका शाळा क्र. ५७ आहे परंतू सदर शाळा ३ वर्षापासून बंद आहे मात्र सदर शाळेच्या ३ वर्गखोल्या अदयावत

असून शिवकॉलनी, आशाबाबा नगर व आर.एम.एस.कॉलनी भागातील नागरीकांच्या मागणीनूसार शिवकॉलनी भागातील शाळा क्र.५७ मधील एका वर्गखोलीत लोकसहभागातुन " आदयकवी महर्षी वाल्मीक " या नावाने वाचनालय सुरु करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे अश्विन शांताराम**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २३)** श्री कालिंका माता मंदीराजवळील चौकाचे " लेवा पाटीदार चौक " असे नामकरण करणेस तसेच या चौकाचे सुशोभिकरणाचे काम लोक सहभागातुन जळगांव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ मार्फत करणेबाबत मा.उपमहापौर, श्री.सुनिल वामनराव खडके व जळगांव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.रेश्मा काळे :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री. सुनिल खडके :-** माझे अनुमोदन आहे

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री कालिंका माता मंदीराजवळील चौकाचे " लेवा पाटीदार चौक " असे नामकरण करणेस तसेच या चौकाचे सुशोभिकरणाचे काम लोक सहभागातुन जळगांव जिल्हा लेवा पाटीदार मंडळामार्फत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर चौकास यापूर्वी कोणाचेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २४)** मा.उपमहापौर यांच्यासाठी नविन वाहन खरेदी करणेबाबत मा.उपमहापौर,श्री.सुनिल वामनराव खडके यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, उपमहापौर यांच्यासाठी नविन वाहन खरेदी करणेबाबतचा सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २५)** विशेष महासभा ठराव क्रं.३६६ दिनांक ०३/०२/२०२१ अन्वये ११ विशेष समित्यांमध्ये भाजपा - ०५ व शिवसेना - ०२ याप्रमाणे प्रत्येक समितीत मनपा सदस्यांचे नावे समाविष्ट करुन ११ विशेष समित्या गठीत करणेबाबत श्री.राजेंद्र झिपरु पाटील, सभापती, स्थायी समिती, श्री.भगतराम रावलमल बालाणी, गटनेता, भाजपा, सौ.रंजना भरत सपकाळे, सभापती, महिला व बालकल्याण समिती व इतर मनपा सदस्य यांच्या दि.१२/०२/२०२१ च्या प्रस्तावात नमुद केल्यानुसार मा.महापौर, सौ.भारती कैलास सोनवणे यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर महोदया यांनी श्री. भगतराम रावलमल बालाणी, भाजपा, गटनेते व श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी, शिवसेना, गटनेते यांच्याकडुन आलेले ११ विशेष समित्यांचे सदस्य व समिती प्रमुख यांचे नावांचे वाचन केले.**

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम अतिक्रमण समिती मध्ये एक नाव चेंज करायचे आहे. काही मोठा विषय नाही अतिक्रमण समितीबाबत आहे. आणि जो पर्यंत वाहुळे साहेब आहे. तो पर्यंत आपल्याला हे कराव लागेल.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा, सर्व नवनिर्वाचित समिती सदस्यांच अभिनंदन आणि विशेष अभिनंदन श्री.नितीनभाऊ बरडे यांच कारण ११ समित्यांमधुन ०९ समित्यांमध्ये श्री.नितीनभाऊ बरडे हे सदस्य म्हणुन नियुक्त झालेले आहे. श्री.नितीनभाऊ बरडेंच विशेष अभिनंदन.हे नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदा घडलेल आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.रंजना सपकाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढची मिटींग घ्या.

**श्री.रियाज बागवान :-** एम.आय.एम.की तरफ से सभी समिती के चुने गए सदस्यों को बधाई.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं.३६६ दि.०३/०२/२०२१ अन्वये महानगरपालिकेत पुढील विशेष समित्या गठन करणे बाबत मान्यता प्रदान केलेली आहे. १) बांधकाम समिती २) अतिक्रमण समिती ३) स्वच्छता समिती ४) पाणी पुरवठा समिती ५) दवाखाना समिती ६) नियोजन समिती ७) आस्थापना समिती ८) विधी समिती ९) वाहन व्यवस्था समिती १०) शिक्षण समिती ११) विदयुत समिती, प्रत्येक समितीमध्ये ७ सदस्य असतील व प्रत्येक समितीमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५ सदस्य व शिवसेना पक्षाचे २ सदस्य असे पक्षीय बलाबल ठेवणेत यावे असा ठराव पारीत करण्यांत आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३१ अ (१) व (२) अन्वये प्रत्येक समितीत ७-७ सदस्यांची नेमणूक करणेसाठी पक्षीय तौलनिक संख्याबळ निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर विशेष समित्यांवर सदस्यांची नियुक्ती करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ अ (२) मधील तरतूदीनुसार महापौर यांनी उपमहापौर,सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, गटनेते (भाजपा, शिवसेना, एम.आय.एम.) यांचेशी चर्चा व विचार विनिमय करुन पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार सदस्य नियुक्त करणेकामी दिनांक ११/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता महापौर यांनी बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीस महापौर, उपमहापौर, सभापती,स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता, गटनेता (भाजपा) , गटनेता (शिवसेना), गटनेता (एम.आय.एम.) हे उपस्थित होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१ अ (२) तरतूदीनुसार व पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार विशेष समित्यांवर सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करणे संबंधात दि.२६/०२/२०२१ रोजी आयोजित केलेल्या महासभेत महापौर यांना गटनेता (भाजपा), गटनेता (शिवसेना) यांनी खाली नमूद केलेप्रमाणे विशेष समितीनिहाय बंद पाकीटात नामनिर्देशित सदस्यांची तसेच समिती प्रमुखांची नावे दिलेली असून त्याचे महापौर यांनी सभागृहात वाचन केले.

| | | |
|---|---|---|
| **१) बांधकाम समिती**<br>१.सोनवणे मुकुंदा भागवत,समिती प्रमुख<br>२.सोनवणे सुरेश माणिक, सदस्य<br>३.भोईटे लताबाई रणजीत, सदस्या<br>४.सोनवणे धिरज मुरलीधर, सदस्य<br>५.पाटील राजेंद्र झिपरु, सदस्य<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.सोनवणे विक्रम किसन, सदस्य | **२) अतिक्रमण समिती**<br>१.कोळी दत्तात्रय देवराम,समिती प्रमुख<br>२.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ, सदस्य<br>३.बाविस्कर किशोर रमेश, सदस्य<br>४.सोनवणे धिरज मुरलीधर, सदस्य<br>५.सोनवणे कैलास नारायण, सदस्य<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.पटेल इब्राहीम मुसा, सदस्य | **३) स्वच्छता समिती**<br>१.मराठे जितेंद्र भगवान,समिती प्रमुख<br>२.काळे रेश्मा कुंदन, सदस्या<br>३.तायडे सुरेखा नितीन, सदस्या<br>४.सपकाळे मिना धुडकू, सदस्या<br>५.सोनवणे सुरेश माणिक, सदस्य<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.नाईक प्रशांत सुरेश, सदस्य |
| **४) पाणी पुरवठा समिती**<br>१.कोल्हे प्रविण रामदास,समिती प्रमुख<br>२.बेंडाळे उज्वला मोहन, सदस्या<br>३.जोहरे प्रिया मधुकर, सदस्या<br>४.काळे अमित पांडुरंग, सदस्य<br>५.बारी शोभा दिनकर, सदस्या<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.नाईक प्रशांत सुरेश, सदस्य | **५) दवाखाना समिती**<br>१.पाटील चंद्रशेखर शिवाजी,समिती प्रमुख<br>२.सोनवणे अश्विन शांताराम, सदस्य<br>३.सोनवणे कांचन विकास, सदस्या<br>४.खडके विश्वनाथ सुरेश, सदस्य<br>५.पाटील प्रतिभा सुधिर, सदस्या<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.चौधरी मनोज सुरेश, सदस्य | **६) नियोजन समिती**<br>१.ढेकळे सदाशिव गणपत,समिती प्रमुख<br>२.बालाणी भगतराम रावलमल, सदस्य<br>३.कोल्हे सिंधू विजय, सदस्या<br>४.तायडे सुरेखा नितीन, सदस्या<br>५.चौधरी मंगला संजय, सदस्या<br>६.भंगाळे विष्णु रामदास, सदस्य<br>७.जोशी अनंत हरिश्चंद्र, सदस्य |
| **७) आस्थापना समिती**<br>१.चव्हाण ज्योती बाळासाहेब,समिती प्रमुख<br>२.आहुजा मनोज नारायणदास, सदस्य<br>३.शेख हसीना बी शरीफ, सदस्या<br>४.पाटील राजेंद्र झिपरु, सदस्य<br>५.चौधरी चेतना किशोर, सदस्या<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.नाईक प्रशांत सुरेश, सदस्य | **८) विधी समिती**<br>१.पोकळे दिलीप बबनराव,समिती प्रमुख<br>२.कोल्हे ललित विजय, सदस्य<br>३.राणे गायत्री इंद्रजीत, सदस्या<br>४.सोनार रंजना विजय, सदस्या<br>५.सनकत चेतन गणेश, सदस्य<br>६.महाजन सुनिल सुपडू, सदस्य<br>७.जोशी अनंत हरिश्चंद्र, सदस्य | **९) वाहन व्यवस्था समिती**<br>१.पाटील विजय पुंडलिक,समिती प्रमुख<br>२.पाटील रेखा चुडामण, सदस्या<br>३.देशमुख प्रतिभा गजानन, सदस्या<br>४.सोनवणे सुरेखा सुदाम, सदस्या<br>५.पाटील मिनाक्षी गोकुळ, सदस्या<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.सोनवणे विक्रम किसन, सदस्य |
| **१०) शिक्षण समिती**<br>१.नेरकर सरीता अनंत, समिती प्रमुख<br>२.चव्हाण ज्योती बाळासाहेब, सदस्या<br>३.सोनवणे अंजनाबाई प्रभाकर, सदस्या<br>४.खान रुक्सानाबी गबलु, सदस्या<br>५.पाटील सचिन भिमराव, सदस्य<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.नाईक प्रशांत सुरेश, सदस्य | **११) विदयुत समिती**<br>१.भिल पार्वताबाई दामु, समिती प्रमुख<br>२.राणे गायत्री इंद्रजीत, सदस्या<br>३.पाटील कुलभुषण विरभान, सदस्य<br>४.खडके सुनिल वामनराव, सदस्य<br>५.पाटील उषा संतोष, सदस्या<br>६.बरडे नितीन मनोहर, सदस्य<br>७.पटेल ईब्राहीम मुसा, सदस्य | |

गटनेते यांनी उपरोक्त प्रमाणे शिफारस केलेनुसार समिती निहाय समिती प्रमुखांसह सात-सात सदस्यांची त्या त्या विशेष समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

तसेच उपरोक्त ११ समित्यांचे सचिव म्हणुन संबंधित विभागांचे विभाग प्रमुख यांची नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. संबंधित विभाग प्रमुख (विशेष समिती सचिव) यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार समितींच्या बैठकीचे कामकाज करावे व त्यासंबंधीत सर्व अभिलेखे जतन करुन आपल्या ताब्यात ठेवावेत.

उपरोक्त सर्व ११ विशेष समित्यांचे समितीप्रमुख यांचेसाठी दालन, वाहन तसेच आवश्यक तो कर्मचारी वर्ग देणेसही मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- सपकाळे रंजना भरत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २६)** महासभा ठराव क्रं.३१५ दि.२३/०९/२०२० मध्ये प्रस्तावीत केलेली काही विकास कामे शासनाच्या ४२.०० कोटी निधी अंतर्गत समाविष्ठ असल्याने तसेच काही विकास कामे शासनाच्या नगरोत्थान / दलितेत्तर निधीत / शासनाच्या शिल्लक निधीत प्रस्तावीत करण्यात आलेली असल्याने महासभा ठराव क्र.३१५ दि.२३/०९/२०२० रद्द करुन जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सन २०२०-२१ च्या मनपा बजेट मधील तरतूदीस अनुसरुन सोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते ९८ व ०१ याप्रमाणे सुधारीत विकास कामे करण्यास व त्याअनुषंगीक येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर,सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सन २०२०-२१ मध्ये नविन रस्ते विकसीत करण्याबाबत यापुर्वी महासभेने ठराव क्रं.३१५ दि.२३/०९/२०२० नुसार विविध रस्ते व बगीचा विकसीत करण्यास मान्यता दिली होती. परंतु या ठरावात प्रस्तावीत केलेली विकास कामे शासनाच्या ४२.०० कोटी निधी अंतर्गत कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग यांचे कडील कार्यादेशात समाविष्ठ आहेत. तसेच काही विकास कामे शासनाच्या नगरोत्थान / दलितेत्तर निधीत / शासनाच्या शिल्लक निधीत प्रस्तावीत करण्यात आलेली आहेत. यापैकी काही प्रकरणांना निधी बाबत मान्यता देखील प्राप्त झालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन यापुर्वी केलेला महासभा ठराव क्रं.३१५ दि.२३/०९/२०२० हा रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच या वर्षी असलेल्या बजेट तरतूदीनूसार रक्कम रु.७०.०० कोटी रक्कमेची तरतूद नवीन रस्त्यांसाठी केलेली असुन त्याअनुषंगाने तसेच अमृत योजनेचे काम पुर्णत्वाच्या जवळपास असल्याने खालील यादीतील नमुद अ.क्रं.०१ ते ९८ व ०१ याप्रमाणे सुधारीत विकास कामे करण्यास व त्याअनुषंगीक येणाऱ्या एकूण रक्कम रु.७०,२७,३१,१६३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मनपा सन २०२०-२१ बजेट मधील मनपा निधी अंतर्गत प्रस्तावीत विकास कामांची यादी

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१ कानळदा रोड लाकुड पेठ ते क्षेत्रीय मराठा कार्यालय ते काळे नगर श्री.राहूल तिवारी यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २८४६१३८/- |
| २. | प्र.क्र.१ मध्ये बौध्द विहार ते कानळदा रस्त्यापर्यंतचा रिंगरोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ४१०००००/- |
| ३. | प्र.क्र.१ केसी पार्क ते महाविर जिन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४८५००००/- |
| ४. | प्र.क्र.१ शिवाजी नगर धनाजी काळे नगर ते आव्हाणे रोडपर्यंतचा २४ मी रुंद रस्ता डांबरीकरण करणे | ८७०००००/- |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्र.क्र.२ स्वामी समर्थ केंद्र ते असोदा रोड व सुळे बाईची चक्कीची गल्ली एल पट्टा रस्ता डांबरीकरण करणे | ३१८७६७४/- |
| ६. | प्र.क्र.२ असोदा रोड घरकुल ते प्रशांत चौक ते रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४५०३२२२/- |
| ७. | प्र.क्र.२ श्री.कंक यांच्या घरापासुन ते क्रांतीचौक ते शिवाजी नगर हुडको कोपऱ्या पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४५७००००/- |
| ८. | प्र.क्र.२ अनिल प्रोव्हीजन ते सोपान कोळी यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २५०००००/- |
| ९. | प्र.क्र.२ मधील हरीओम नगर हनुमान मंदिर ते साईबाबा मंदीरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १८०००००/- |
| १०. | प्र.क्र.२ मधील हरीओम नगर मधील वॉशिंग सेंन्टर जवळील ४ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५००००००/- |
| ११. | प्र.क्र.२ मधील मुरलीधर गयबु सपकाळे ते दत्तु वायरमन यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १२०००००/- |
| १२. | प्र.क्र.२ शिवाजी नगर क्रांती चौक ते दाळफळ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २१०००००/- |
| १३. | प्र.क्र.२ मनपा डि.बी.जैन दवाखाना ते ममुराबाद रोड रस्ता डांबरीकरण करणे. | ८५०००००/- |
| १४. | प्र.क्र.२ कांचन नगर आसोदा रोड ते गणपती मंदीर ते सपकाळे रस्ता डांबरीकरण करणे. | ६८०००००/- |
| १५. | प्र.क्र.२ पवन नगर मध्ये सात खोल्यांजवळील मुख्य रस्ता डांबरीकरण करणे. | ४००००००/- |
| १६. | प्र.क्र.३ मधील असोदा रोड ते तानाजी मालुसरे नगर मधील गोपाल सोनवणे यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २९६२०५०/- |
| १७. | प्र.क्र.३ मध्ये असोदा रोड पासुन दिनकर नगर मोहन टॉकीजच्या मागे कैलास कोळी यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २०५००००/- |
| १८. | प्र.क्र.३ नॅशनल हायवे ते खेडी तलाठी कार्यालया पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २६०००००/- |
| १९. | प्र.क्र.४ पुष्पलता बेंडाळे चौक पांझरापोळ चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १५१७९४०/- |
| २०. | प्र.क्र.४ बॉम्बे हार्डवेअर ते सुर्या सॉ मिल (जोशीपेठ) पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २०२३९२०/- |
| २१. | प्र.क्र.४ शनिपेठ पोलिस चौकी ते ओक मंगल कार्यालयापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १९०००००/- |
| २२. | प्र.क्र.४ भिलपुरा पोलिस चौकी ते ममुराबाद रेल्वे पुलापर्यंतचा रस्त्याला जोडणारे पुर्व पश्चिम ५ रस्ते डांबरीकरण करणे (डावी बाजुकडील) | २५०००००/- |
| २३. | प्र.क्र.५ नवीपेठ पत्री हनुमान मंदीर ते ममुराबाद रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३१६२३७५/- |
| २४. | प्र.क्र.५ गोविंदा रिक्षा स्टॉप ते पिंप्राळा रेल्वेगेट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ५९९८८६०/- |
| २५. | प्र.क्र.५ रेल्वे स्टेशन ते जिल्हा परिषद पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४०४७८४०/- |
| २६. | प्र.क्र.५ नविपेठ एल.आय.सी.ऑफिस ते रथ चौक रस्ता डांबरीकरण करणे. | ७६०००००/- |
| २७. | प्र.क्र.५ मधील बॉम्बे मेडीकल ते टेलिफोन ऑफिस पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३६०००००/- |
| २८. | प्र.क्र.५ मधील स्टेट बँक ते भिकमचंद जैन मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २५०००००/- |
| २९. | प्र.क्र.५ रेल्वे स्टेशन ते नेहरु चौक रस्ता डांबरीकरण करणे. | ५५०००००/- |
| ३०. | प्र.क्र.५ कोर्ट चौक ते चित्रा चौक ते शिवाजी रोड रस्ता डांबरीकरण करणे. | ९००००००/- |
| ३१. | प्र.क्र.५ ऑर्किड हॉस्पिटल ते गुजरात स्विट मार्ट रस्ता डांबरीकरण करणे. | ३४०००००/- |
| ३२. | प्र.क्र.५ विजय टाईम्स ते हनुमान मंदिर (व.वा.मार्केट) रस्ता डांबरीकरण करणे. | १७०००००/- |
| ३३. | प्र.क्र.४,५ भिलपुरा पोलीस चौकी ते ममुराबाद रेल्वे पुल (ममुराबाद रस्ता) डांबरीकरण करणे. | २५२९९००/- |

| | | |
|---|---|---|
| ३४. | प्र.क्र.६ सुपारी कारखाना ते रुख्मा टेंट हाऊस पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४०६४७६५/- |
| ३५. | प्र.क्र.६ बाबा हरदासराम मंगल कार्यालय ते आंबेडकर नगर पर्यंतचा रस्ता व बीएसएनएल क्वार्टर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८१२९०००/- |
| ३६. | प्र.क्र.६ मंजुषा हौ.सोसायटी मधील श्री.डांबरी आप्पा यांचे घरापासुन ज्ञानदेव मंदिरा पर्यंतचा रस्ता डांबरी करणे. | १३५००००/- |
| ३७. | प्र.क्र.६ दत्त कॉलनी मधील डॉ.अशोक पाटील यांचे घरासमोर शिवशक्ती कार बाजार मागील गल्लीतील रस्ता डांबरी करण करणे. | ९२२०००/- |
| ३८. | प्र.क्र.६ स्वातंत्र चौक ते प्रभात चौक रस्ता डांबरीकरण करणे. | ६००००००/- |
| ३९. | प्र.क्र.५ व ६ स्वातंत्र चौक ते नेरी नाका चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १८०००००० /- |
| ४०. | प्र.क्र. ६ गिरणा वसाहत येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ८९९५००/- |
| ४१. | प्र.क्र. ५ व ६ शास्त्री टावर ते कोर्ट चौक ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक रस्ता डांबरीकरण करणे. | ४००००००० /- |
| ४२. | प्र.क्र. ७ शासकीय औदयोगीक प्रशिक्षण संसथेच्या पुर्वेकडील रस्ता डांबरीकरण करणे. | ३२७९५५१/- |
| ४३. | प्र.क्र.७ आशाबाबा मंदीर ते पिंप्राळा गट नं.८७ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४०८४७२२/- |
| ४४. | प्र.क्र.७ वर्धमान हाईट ते पिंप्राळा गट नं.८० पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४०८४७२२/- |
| ४५. | प्र.क्र.७ पिंप्राळा रेल्वे गेट ते बजरंग बोगदा (नवसाचा गणपती मंदीर रस्ता) डांबरीकरण करणे. | ४८३७३२०/- |
| ४६. | प्र.क्र.७ रिंगरोड हनुमान मंदिर ते चंद्रप्रभात कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३६५८०००/- |
| ४७. | प्र.क्र.७ युनिटी चेंबर ते प्रभुदेसाई कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५४२००००/- |
| ४८. | प्र.क्र.७ पिंप्राळा गट नं.८७ आर.एम.एस.कॉलनी मागील भागाचा रस्ता डांबरीकरण करणे. | १६८००००/- |
| ४९. | प्र.क्र.७ बहिणाबाई उदयान ते पिंप्राळा रेल्वे गेट रस्ता डांबरीकरण करणे. | ३५०००००० /- |
| ५०. | प्र.क्र.७ मारोती पार्क ते खंडेराव नगर ते पुला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००००/- |
| ५१. | प्र.क्र.६ व ७ स्वातंत्र चौक ते रुबि हॉस्पिटल रस्ता डांबरीकरण करणे. | ८००००००/- |
| ५२. | प्र.क्र.८ गुड्डूराजा नगर ते स.नं.२९० पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | ८६७२०६०/- |
| ५३. | प्र.क्र.८ निमखेडी रोड ते नॅशनल हायवे ६ गट नं.११८/५, ११८/६ मधून व्दारका नगर रस्ता डांबरीकरण करणे. | ११९२४९१५/- |
| ५४. | प्र.क्र.८ दादू अर्पाटमेंट ४० खोल्या ते श्रीराम मंदीरा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४८५००००/- |
| ५५. | प्र.क्र.८ सायली मेडीकल ते दादू अर्पाटमेंट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १५०००००/- |
| ५६. | प्र.क्र.८ सुरत रेल्वे गेट ते निमखेडी रस्ता डांबरीकरण करणे. | ५६३८५०००/- |
| ५७. | प्र.क्र.९ कृष्णा टॉवर पासुन सुबोध क्लासेसकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. | ३८६०३७०/- |
| ५८. | प्र.क्र.९ बारी कॉम्प्लेक्स परमार्थ निकेतन आर.एल.कॉलनी ते आव्हाणे रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ७०६३२७३/- |
| ५९. | प्र.क्र.९ पिंप्राळा सोमानी मार्केट ते नॅशनल हायवे पर्यंतचा (बाजार रोड ) पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५१४७८५१/- |
| ६०. | प्र.क्र.८,९ बजरंग बोगदा ते सुरत रेल्वे गेट परिसरातील रस्ते (एसएमआयटी रस्ता) पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६६९०३६७/- |

| | | |
|---|---|---|
| ६१. | प्र.क्र.८ व ९ पिंप्राळा रेल्वे गेट ते सोमाणी मार्केट रस्ता डांबरीकरण करणे. | १५२६००००/- |
| ६२. | प्र.क्र.१० सोमानी मार्केट ते पिंप्राळा दर्गा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३७९४८५०/- |
| ६३. | प्र.क्र.१० खंडेराव नगर ते हूडको पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३१००८००/- |
| ६४. | प्र.क्र.११ कोल्हे नगर १०० फुट रोड ते गिरणा पंपींग रोड पर्यंत १०० फुटी रिंगरोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २३१९५५००/- |
| ६५. | प्र.क्र.११ रामानंद नगर पोलीस स्टेशन ते विदयुत कॉलनीमार्गे हायवे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३७९४०००/- |
| ६६. | प्र.क्र.११ वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर रेल्वे पुलापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ७७५२०००/- |
| ६७. | प्र.क्र.११ दत्त डिगंबर हौ.सोसा. ते गिरणा पंपिंग पर्यंतचा ३० मीटर रुंद रस्ता डांबरीकरण करणे. | ३५८५३००/- |
| ६८. | प्र.क्र.१२ ओंकारेश्वर मंदीर ते साईबाबा मंदीर (सुयोग कॉलनी) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १६३२९१२/- |
| ६९. | प्र.क्र.१२ अल्पबचत निवासी क्वार्टर ते जी.एस.टी.भवन ते हायवे सर्व्हीस रोड डांबरीकरण करणे. | २९७२६३३/- |
| ७०. | प्र.क्र.११,१२ एकलव्य जिम (एम.जे.कॉलेज) ते शिव कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ७७५२०००/- |
| ७१. | प्र.क्र.१२ आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ८७४१८१७/- |
| ७२. | प्र.क्र.१२ अग्रवाल हॉस्पिटल ते ऑफिसर क्लब पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ५६८६८१६/- |
| ७३. | प्र.क्र.१२ व १३ मधील काव्यरत्नावली चौक ते महाबळ चौक रस्ता डांबरीकरण करणे. | ९३६२८३९/- |
| ७४. | प्र.क्र.१२ पार्वती नगर मधिल रजनी अपार्टमेंट ते चर्च रोड पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | २५००००००/- |
| ७५. | प्र.क्र.१२ पारख नगर येथे श्री.सुभाष भोळे यांचे घरापासुन ते प्लॉट नं.१४ श्री.आर.व्ही. चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २३०००००/- |
| ७६. | प्र.क्र.१३ महाबळ चौक ते जिजाऊ चौक झाकीर हुसैन कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९६१३६२०/- |
| ७७. | प्र.क्र.१३ व १४ डि.मार्ट ते रायसोनी नगर ते मोहाडी रोड रस्ता डांबरीकरण करणे. | २६३०९०८९/- |
| ७८. | प्र.क्र.१३ रायसोनी नगर मधील मोहाडी रोड ते मेहरुण स.नं.४६४ पर्यंतचा मुख्य रस्ता डांबरीकरण करणे. | ३९७४२९६/- |
| ७९. | प्र.क्र.१४ गणपती मंदीर ते हायवे पर्यंतचा गणपती नगर मधील मुख्य रस्ता डांबरीकरण करणे. | ३०३५८८०/- |
| ८०. | प्र.क्र.१४ अशोक किराणा ते जकात सोसायटी पर्यंतचा रोड डांबरीकरण करणे. | ५८३२२६३/- |
| ८१. | प्र.क्र.१४ मेहरुण पाणी पुरवठा कार्यालय ते स्वामी समर्थ चौक ते तुळजामाता नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४९३४९९२/- |
| ८२. | प्र.क्र.१४ मेहरुण अशोक किराना चौक ते स.नं.२५० (दिनेश किराना) रस्ता डांबरीकरण करणे. | ५३८४२६७/- |
| ८३. | प्र.क्र.१४ काव्यरत्नावली चौक ते डी मार्ट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ९१२९०९७/- |
| ८४. | प्र.क्र.१५ मेहरुण गांव बुरुझ ते महादेव मंदीर ते शामा फायर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ११८८३०८१/- |
| ८५. | प्र.क्र.१५ तांबापुरा महादेव मंदिर ते शिरसोली नाका रस्ता डांबरीकरण करणे. | ४१४३०००/- |
| ८६. | प्र.क्र.१६ नानीबाई हॉस्पिटल ते हेमु कलानी टाकी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४६१७०६८/- |
| ८७. | प्र.क्र.१६ देविदास कॉलनी ते टी.एम.नगर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४७४३५६३/- |
| ८८. | प्र.क्र.१६ पंचमुखी हनुमान मंदीर ते डॉ.चिंचोले यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३२४६७०५/- |
| ८९. | प्र.क्र.१७ एस.टी.वर्कशॉप ते का.उ.कोल्हे विदयालय पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ७५८९७००/- |
| ९०. | प्र.क्र.१७ नेरी नाका ते कब्रस्तान पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २२७६९१०/- |
| ९१. | प्र.क्र.१७ पांझरापोळ चौक ते राजाराम मंगल कार्यालय पर्यंत डांबरी रस्ता डांबरीकरण करणे. | ३५०००००/- |

| | | |
|---|---|---|
| ९२. | प्र.क्र.१७ आयोध्या नगर स.क्र.१४१ बगिचा ते जुनी जीन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३७००००००/- |
| ९३. | प्र.क्र.१७ काशीनाथ हॉटेल गृहकुल कॉलनी ते पंढरपुर नगर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. (म्हाडा कॉलनी ते पंढरपुर नगर) | १०२५००००/- |
| ९४. | प्र.क्र.१७ मध्ये हॉटेल संजय ते लिलापार्क पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १९५४८००/- |
| ९५. | प्र.क्र.१८ मेहरुण हॉटेल काशिनाथ ते अशोक किराणा चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ६७३२६०२/- |
| ९६. | प्र.क्र.१८ सारा हॉस्पिटल (घुगे पाटील केरोसिन) चौक ते संतोषी माता गणेशपुरी ते हायवे रस्ता डांबरीकरण करणे. | १०५०००००/- |
| ९७. | प्र.क्र.१८ व १९ औरंगाबाद रोड हॉटेल कस्तुरी ते मेहरुण बुरुजा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १०६२९१०८/- |
| ९८. | प्र.क्र.४, ५, ६, १६ घाणेकर चौक ते बेंडाळे चौक ते पांडे डेअरी ते इच्छादेवी चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३२००००००/- |
| | एकुण रस्त्यांचे अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.:- | ६८२१६४८४३/- |

नविन बगीचा विकसीत करणे व सुशोभिकरण करणे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१२ रामदास कॉलनी ओपनस्पेस मध्ये बगिचा विकसीत व सुशोभिकरण करणे. | २०५६६३२०/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २७)** शासनाकडून अनुज्ञेय अनुसूचित जाती वर्गासाठी असलेल्या निधीतून प्र.क्र.१० अंतर्गत हुडको येथे गट क्रं.२१९ मध्ये अनुसूचित जाती वर्गासाठी अदयावत व्यायाम शाळा बांधकाम करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक १० हा अनुसूचित जाती जमाती वर्गासाठी राखीव असून त्याठिकाणी तेथिल युवकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन अदयावत व्यायाम शाळा तयार करुन तेथिल युवक हे सुदृढ होण्यासाठी तेथे शासनाकडून अनुज्ञेय अनुसूचित जाती वर्गासाठी असलेल्या निधीतून प्र.क्र.१० अंतर्गत हुडको येथे गट क्रं.२१९ मध्ये अदयावत व्यायाम शाळा बांधकाम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २८)** प्र.क्र.१० अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विविध १ ते ११ विकास कामे करणेस व सदर कामी येणारा एकूण रक्कम रु.५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.
**श्री.चेतन सनकत :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक १० हा अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव असून त्यामध्ये दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ११ विकास कामे करणेस व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१० अंतर्गत हुडको घरकुल येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रुपये ५० लक्ष |
| २. | प्र.क्र.१० खंडेराव नगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट गटार तयार करणे. | रुपये ३० लक्ष |
| ३. | प्र.क्र.१० खंडेराव नगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉकने पाथवे तयार करणे. | रुपये ३० लक्ष |
| ४. | प्र.क्र.१० खंडेराव नगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रुपये ४० लक्ष |
| ५. | प्र.क्र.१० अंतर्गत मयुर कॉलनी येथे रस्ता डांबरीकरण व कॉंक्रीटीकरण करणे. | रुपये ५० लक्ष |
| ६. | प्र.क्र.१० अंतर्गत हुडको येथे विविध ठिकाणी कॉक्रीट गटार तयार करणे. | रुपये २० लक्ष |
| ७. | प्र.क्र.१० अंतर्गत गणपती नगर येथे गटारी तयार करणे. | रुपये ४५ लक्ष |
| ८. | प्र.क्र.१० भैरव नगर येथे उर्वरीत भागात रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रुपये ३० लक्ष |
| ९. | प्र.क्र.१० आझाद नगर येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रुपये ६० लक्ष |
| १०. | प्र.क्र.१० पिंप्राळा गावठाण मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रुपये ५० लक्ष |
| ११. | प्र.क्र.१० मधील नाल्यावरती हूडको कडे जाणाऱ्या रस्त्यावर कुंभारवाडया जवळ पुल व संरक्षण भिंत बांधणे. | रुपये ९५ लक्ष |
| | **एकुण रक्कम रुपये :-** | **रुपये ०५.०० कोटी** |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २९)** प्र.क्र.०४ अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विविध १ ते ०३ विकास कामे करणेस व सदर कामी येणारा एकूण रक्कम रु.५० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.मुकुंदा भागवत सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.०४ मध्ये दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ०३ विकास कामे करणेस व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.५० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.०४ अंतर्गत कुंभारवाडा ते मिल पर्यंत रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रुपये २० लक्ष |
| २. | प्र.क्र.०४ अंतर्गत श्री.दिलीप विश्वनाथ सोनवणे यांचे घरापासुन ते श्री.कैलास सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रुपये २० लक्ष |
| ३. | प्र.क्र.०४ अंतर्गत श्री.मनोज विठ्ठल सोनवणे यांचे घरापासून ते कृष्ण मंदीरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे. | रुपये १० लक्ष |
| | एकुण रक्कम रुपये :- | रुपये ५० लक्ष |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३०)** प्र.क्र.०३ अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अदयावत व्यायाम शाळा उभारणे कामी येणारा रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्र.०३ येथे अदयावत व्यायाम शाळा उभारणे कामी येणारा रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा, पुढील महासभा सुरु करण्यापुर्वी,

**मा.महापौर :-** आवाज येत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** आता येत आहे. एक विनंती अशी आहे की, शहरामध्ये श्री.नितीनभाऊ लढढा महापौर असतांना सुप्रिम कॉलनी तर्फे आपण एक स्वच्छतागृह उभारल होत. जुन्या नगरपालिकेच्या जागेवर. आज ४ वर्ष झाले, अतिशय सुस्थीती मध्ये ते स्व:ता मेनटेन करतात. २५ लाख रुपये खर्च करुन त्यांनी बनविलेले आहे. आजही त्यांचेच माणस सांभाळत आहे. मेनटेन आहे सगळ, त्या लोकांनी त्यांच्या कंपनीच्या सी.एस.आर.फंड मधुन काही जागा आपल्याला मागितल्या होत्या की, आम्ही तुम्हाला आणखी ३-४ ठिकाणी हे विकसीत करुन देतो स्वच्छतागृह म्हणुन प्रशासनाकडे आपण तसा प्रस्ताव ही तयार करायला सांगितला होता पण काही अडचणींमुळे अजेंडयावर तो विषय येऊ शकला नाही. तो विषय घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे. कारण याच्यामुळे शहरातील नागरीक असतील, जेष्ठ नागरीक असतील, महिला असतील किंवा संपुर्ण शहराच्या नागरीकांना याचाउपयोग होणार आहे. प्रशासनाचा प्रस्ताव आपण घ्यावा ही विनंती आहे आपल्याला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, या विषयामध्ये मला सुध्दा बोलायच आहे. अश्या पध्दतीने जसा सुप्रिम आपल्याला द्यायला तयार आहे. त्याच पध्दतीने इतरही काही प्रस्ताव प्रशासनाकडे मी स्थायी समिती सभापती असतांना दिलेले आहे. आणि ते प्रशासनाकडे पाठविण्यात आले होते माझ्याकडुन, जळगांव जनता बँक, रोटरी क्लब, अश्या अनेक सेवाभावी संस्था आहे. जे आपल्याला फ्रि ऑफ कॉस्ट स्वच्छतागृह उभारुन देण्यास तयार आहे. प्रशासनाने त्या प्रस्तावांच काय केल या बद्दल सुध्दा खुलासा करावा. आपण जर आयत्यावेळेच्या येच्यात जर मंजुरी देत आहोत सुप्रिमच्या प्रस्तावास तर या सगळे विषयांना आपण मंजुरी द्यायला काही हरकत नाही.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मलाही बोलायच आहे या विषयावर.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेबांनी याच्यावर खुलासा करावा आणि जर असतील ते विषय तर ते पण घ्यावे. हा विषय कम्प्लीट आहे ना.

**श्री.अंनत जोशी :-** महापौर साहेबा, याच्यात दोन स्थळ आपण दिलेले आहे. एक सागर पार्क, एक पोलिस मल्टी पर्पज हॉलची आहे. असे दोन आपण याच्यामध्ये दिले होते. माझी एक विनंती असेल की, सुप्रिम कंपनीचे देसाई साहेबांशी माझ बोलण झाल. त्यांनी ॲग्री केलेल आहे की, ते तिन ठिकाणी करुन देतील. त्यांनी मान्यही केल आहे. सागर पार्क, पोलिस माल्टी पर्पज हॉल, आणि आस्वाद चौक एम.जे. कॉलेज जवळचा. फेब्रुवारी महिन्यात जर तुम्ही मला ठराव करुन दिल तर फेब्रुवारी महिन्यातच कामाला सुरुवात करतो. हे अतिशय लोकांसाठी सुविधाजनक विषय होईल. एम.जे.कॉलेज जवळचा स्पॉट ही याच्यात घेण्यात यावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, जळगांव जनता बँक आणि रोटरी क्लब आणि इतरही ७ ते ८ संस्थांनी माझ्याकडे त्यावेळेला सभापती असतांना सामाजिक सेवा भावी संस्थांनी अर्ज दिलेले होते आणि त्यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी पाठविलेले आहे. अद्यापपर्यंत प्रशासनाने त्याच्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सुप्रिमच्या प्रस्तावाला ताबडतोब मंजुरी देत आहोत. त्याबद्दल प्रशासनाच अभिनंदन. ज्या तत्परतेने ही कार्यवाही केली. त्याच तत्परतेने बाकीच्या प्रस्तावांना सुध्दा कार्यवाही अपेक्षित आहे.

**श्री.अनंत जोशी :-** ताई महापौर ताई याच्यातली अडचण मी तुम्हाला सांगतो तात्काळ आपण सुप्रिमला मंजुरी देत आहोत जेव्हा समाज कार्यासाठी जनता बँक असेल किंवा क्लब असतील.पण हे जागेची मागणी करतात याच्या अडचण काय येते.जेव्हा आपण स्वच्छतागृह उभारायचा विचार करतो त्या वेळेस आपण कुठेही उभारायला गेलो त्यावेळेस आपण कुठेही उभारायला गेलो तर लोकांचा विरोध असतो. माझ्या दारापुढे नको, माझ्या दुकानासमोर नको. माझ्या कार्यालयाबाहेर नको. त्याच्यामुळे स्पॉट निवडायला प्रशासनाला अडचण येत आहे. या ठिकाणी

सागर पार्क आपली जागा आहे, रामदास कॉलनी ओपनस्पेस आपली जागा आहे. मल्टी पर्पज ही शासकीय जागा आहे. त्याच्यामुळे हे स्पॉट लवकर हे झाले आणि त्याच्यामुळे आपण त्यांना मंजुरी देऊ शकतो आहे. जर स्पॉट आपण सुचविले तर त्यालाही मंजुरी मिळेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** एक मिनीट बंटीभाऊ मी तुम्हाला पुन्हा विचारु ईच्छिते. हे तिन्ही चारही स्पॉट आपल्याकडे मागणी केलेले होते, पोलिस मल्टी पर्पज हॉल सुध्दा मागणी केलेला होता. ज्या वेळेला दंडवते साहेब होते, या सर्व स्पॉटची जागेवर जाऊन पाहणी मी सभापती असतांना केलेली आहे. साधारणता शहरातील १३ ते १४ स्पॉट शहरातील फायनल करण्यात आलेले होते. आता प्रश्न फक्त ऐवढाच राहिला होता की, ज्या ज्या सेवाभावी संस्था आले त्यात एकच स्पॉट तीन ते चार सेवाभावी संस्था मागत आहे. फक्त त्यामुळे सगळयांना एकत्रीत बोलवुन घेऊन म्युचवल अन्डरस्टँडींगने प्रत्येकाला दोन दोन तीन तीन स्पॉट द्यावे. आणि तो निर्णय घेण्यात यावा.यासाठी फक्त ती फाईल वर्ष भरापासुन प्रलंबीत आहे.

**श्री.अनंत जोशी :-** ताई काही हरकत नाही. याच्यातले तीनपैकी दोन विषय जे आहे ते माझ्या प्रभाग क्र.१२ मधले आहे. त्यामुळे तेथे द्यायला अडचण नाही काही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बंटीभाऊ तुमच्या याला माझा अजीबात विरोध नाही. त्याला माझ समर्थनच आहे. फक्त जर हा विषय मार्गी लागतो आहे. तर त्यासोबत शहरामध्ये १४ ठिकाणी मी सभापती असतांना ते...

**श्री.नितीन बरडे :-** ते काम सुरु होऊन जाईल तो पर्यंत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ते सगळ काम सुरुहोऊन जाईल एकाच वेळेला.

**श्री.अनंत जोशी :-** ताई, आपल म्हणण एकदम रास्त आहे. फक्त एक विनंती आहे की, याला मंजुरी द्या कारण की हे रखडुन जाईल नाही तर.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलण्याची परवानगी द्यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हे थांबवा अस मी म्हणतच नाही.

**श्री.कैलास सोनवणे:-** सगळे विषय मंजुर करण्यात यावे जे लोक तयार असतील त्यांच्याकडुन ते करुन घ्यावे. सगळे मंजुर, फक्त आपली प्रोसिजर करुन घ्या.

**श्री.चेतन सनकत :-** हे मागासवर्गीय संस्था वेळोवेळी पत्र व्यवहार करत आहे. तरी पण आपले प्रशासन करत नाही. ते जे मागासवर्गीय संस्था आहे त्यांचा ही विषय याच्यामध्ये करण्यात यावा. त्यांनाही सोबत घेण्यात याव.

**मा.महापौर :-** सुप्रिम कंपनी,जळगांव यांच्या सागर पार्क व पोलिस मल्टी पर्पज हॉल येथे शौचालय बांधण्यास परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव दिलेला असुन यांनी आयत्यावेळेस विषय घेण्याबाबत विनंती केलेली आहे. सदरचा प्रस्ताव स्विकारण्यात येत आहे. तरी सभागृहाने त्यास मान्यता द्यावी.

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ०१)** द सुप्रिम इंडस्ट्रीज लि. जळगांव यांना (CSR) अंतर्गत सागरपार्क येथे व पोलीस मल्टीपर्पज हॉल जवळील रस्त्यालगत शौचालय बांधण्यास परवानगी देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सिनिअर जनरल मॅनेजर सुप्रिम इंडस्ट्रीज लि. पोस्ट गाडेगांव जि.जळगांव यांचा सामाजीक बांधीलकी उपक्रमा अंतर्गत (CSR) नविन शौचालयाचा प्रस्ताव मंजुर होणे बाबतचे दि.२८/०१/२०२१ चे पत्रात सुप्रिम कंपनी मार्फत या पूर्वी मनपा मालकीच्या महात्मा फुले मार्केट समोरील जुन्या न.पा.च्या जागेवर सन २०१८ मध्ये मनपा मार्फत रितसर परवानगी प्राप्त करुन पे ॲण्ड युज या तत्वावर अत्याधुनीक सार्व.शौचालय बांधलेले असुन त्याची आजता गायत अत्यंत उत्तम रितीने देखभाल व व्यवस्था करण्यात येत आहे. सदर व्यवस्था सुरु झाल्याने परिसरातील अनेक

व्यापारी संकुलातील व्यापारी, कर्मचारी, ग्राहक व इतर नागरीक व महिला वर्गाची चांगल्या प्रकारे सोय झालेली आहे. या शौचालयाची देखभाल याच कंपनी मार्फत करण्यात येत आहे व या कंपनीने या बाबतचा तीस वर्षा करीताचा करार देखील म.न.पा.सोबत केलेला आहे. अश्याच प्रकारची सुवीधा शहरातील इतर आवश्यक भागांमध्ये देखील करण्यात यावी अशी नागरिकांची देखील अपेक्षा आहे. त्यास अनुसरुन या कंपनीचे प्रतिनिधी, मनपा आरोग्य विभाग व बांधकाम विभाग यांच्या अधिकाऱ्यांसोबत उपायुक्त यांच्या कक्षात चर्चा होऊन सागर पार्क, पोलीस मल्टीपर्पज हॉल व जिल्हा न्यायालयाच्या मागील बाजुस उत्तरे कडील रस्त्यावर अशी व्यवस्था होऊ शकते असे सुचविण्यात आले व त्यानंतर खालील स्थळ निरिक्षण देखील करण्यात आले.

१) सागर पार्क :- या ठिकाणी पूर्व दक्षिण कोपऱ्याकडील मनपाच्या मशनरी विभागाच्या कार्यालयाकडील बाजुस जागा उपलब्ध होऊ शकते. मात्र यापूर्वीदेखील या ठिकाणी शौचालयाच्या बांधकामाकरीता संबंधीत शाखा अभियंता यांच्या सोबत पाहणी केली असता त्या ठिकाणी सांडपाणी वाहुन जाण्याकरीता ड्रेनेजची सोय नसल्याने बांधकाम प्रस्तावित करता आले नाही. यावर कंपनीचे प्रतिनिधी यांनी या अडचणीवर मात करण्याकरीता अत्याधुनीक पध्दतीचे अदयावत यंत्रणा लावुन सागर पार्क येथे निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रीया करुन तेच पाणी पुन्हा वापरण्या योग्य (रिसायकलींग) करणे शक्य आहे व त्याच पध्दतीने या ठिकाणी शौचालय बांधण्यास मनपाने परवानगी दिल्यास आम्ही तयार आहोत असे सांगीतले.

२) पोलीस मल्टीपर्पज हॉल :- या ठिकाणी हॉलच्या पूर्वेस असलेल्या स्वातंत्र चौक ते कोर्ट चौक या रस्त्याच्या जागेत हॉलच्या कुंपण भिंतीच्या गेट पासुन दक्षीणेस आठ ते दहा फुट जागा सोडुन कुंपण भिंती लगत असलेल्या गटारीच्या बाजुस शौचालय बांधणे शक्य आहे. या ठिकाणी ड्रेनेजची व्यवस्था आहे, मात्र त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करणे देखील आवश्यक आहे.

३) जिल्हा न्यायालयाच्या मागे :- जिल्हा न्यायालयाच्या उत्तर बाजुस असलेल्या पूर्व पश्चिम रस्त्यावरील न्यायालयाच्या गेटच्या पूर्व बाजुस दहा फुट जागा सोडून रस्त्याच्या जागेवर शौचालय बांधणे शक्य आहे. या ठिकाणी ड्रेनेज व्यवस्था आहे मात्र पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

उपरोक्त पत्रामध्ये कंपनीचे सिनीयर जनरल मॅनेजर यांनी सामाजीक बांधीलकी उपक्रमा अंतर्गत सागर पार्क व पोलीस मल्टी पर्पज हॉल या दोन ठिकाणी वर नमुद केल्या प्रमाणे पे ॲण्ड युज तत्वावर शौचालय बांधकाम करण्यास मनपाने रितसर परवानगी दिल्यास कंपनी सदर काम करण्यास तयार असल्याचे नमुद केले आहे.

उपरोक्त प्रमाणे द.सुप्रिम इंडस्ट्रीज लि.जळगांव यांना सामाजीक बांधीलकी उपक्रमा अंतर्गत मनपा मालकीच्या १) सागर पार्क येथे २) पोलीस मल्टी पर्पज हॉलच्या पूर्वेस असलेल्या मुख्य रस्त्याच्या जागेत व सभागृहात सन्मा.सदस्य यांनी मागणी केलेनूसार ३) एम.जे.कॉलेज आस्वाद चौक जवळील जागेत पे ॲण्ड युज तत्वावर शौचालय बांधकाम करण्यास मनपाचे अटी व शर्तीस बंधनकारक राहुन तसेच नगररचना विभागाकडून सदर शौचालयाचे बांधकाम नकाशे प्रमाणित करुन घेवून परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच प्रशासनाकडेस शहरात शौचालय बांधकाम करणे संबंधात विविध संस्थेमार्फत याचसंदर्भात जे काही प्रस्ताव आलेले असतील त्यांचेकडुन सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन घेवुन शौचालयाचे बांधकाम करणेस मनपाचे अटी व शर्तीस बंधनकारक राहून मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- सोनवणे मुकूंदा भागवत**

**मा.महापौर :-** ही महासभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी पुढील विशेष महासभा सुरु करावी व राष्ट्रगीत विशेष महासभेच्या शेवटी घेण्यात यावे.

**सही/-**
**(भारती कैलास सोनवणे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**